नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक ३३ * * अमरावती * | रविवार, दिनांक ३ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एक आठवडा आधीच अमरनाथ यात्रा बंद

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २ :
अमरनाथ यात्रा थांबवण्यात आली आहे. ही यात्रा ९ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार होती, परंतु मुसळधार पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे ती थांबवण्यात आली.

काश्मीरचे विभागीय आयुक्त विजय कुमार बिधुरी म्हणाले की, पावसामुळे यात्रा मार्गांचे बरेच नुकसान झाले आहे. बालटाल आणि पहलगाम दोन्ही मार्गांवर दुरुस्तीचे काम केले जाईल, त्यामुळे यात्रा थांबवावी लागली आहे. मार्गांवर सतत मशीन आणि कर्मचारी तैनात असल्याने यात्रा पुन्हा सुरू करणे शक्य नाही. यावर्षी आतापर्यंत ४.१० लाख भाविकांनी अमरनाथ गुहेला भेट दिली आहे.

# तूर्तास खातीच बदलली... यापुढे काळजी घ्यावी!

## वादग्रस्त मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :
मागील काही काळामध्ये राज्याच्या मंत्र्यांची वागणुक, मंत्र्यांच्या संदर्भात घडलेल्या घटनांची राज्यात मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. त्यामुळे अजित पवार आणि आम्ही चर्चा करून दोन मंत्र्यांची खाती एकमेकांत बदलून दिली आहेत. सध्या तरी मंत्रिमंडळामध्ये आणखी बदल होण्याची काहीही शक्यता नाही.

मंत्र्यांनी जनतेसमोर, माध्यमांसमोर बोलताना आणि वागताना योग्य वर्तन ठेवले पाहिजे याची दक्षता घ्यावी. यापुढे कोणत्याही मंत्र्यांचे वर्तन अयोग्य असेल तर त्या मंत्र्यावर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे माध्यमांशी बोलताना दिला.



राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) धनंजय मुंडे मला तीनदा भेटले, पण यात मंत्रिमंडळासंदर्भात चर्चा झाली नाही. मंत्रिमंडळाच्या रचनेसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांच्याशी चर्चा करावी लागते; ही चर्चा धनंजय मुंडे यांच्या स्तरावर होत नाही, असेही फडणवीस म्हणाले.

यूपीए सरकार केंद्रात असताना, जाणूनबुजून हिंदू दहशतवाद असा शब्दप्रयोग करून संपूर्ण हिंदू समाजाला दहशतवादी ठरवण्याचे काम यूपीए सरकारच्या वतीने झाले, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला.

मालेगावच्या स्फोटाच्या घटनेनंतर काँग्रेस पक्षाने हिंदू दहशतवाद किंवा भगवा दहशतवाद असा नॅरेटिव्ह तयार केला होता. तो आता पूर्णपणे खोटा ठरला आहे.

१९९० च्या दशकाच्या शेवटी आणि २००० च्या सुरुवातीस संपूर्ण जगभरात मोठ्या प्रमाणावर दहशतवादी घटना घडल्या. अनेक घटनांचे धागेदोरे पाकिस्तानपर्यंत गेले. त्यामुळे इस्लामिक दहशतवाद असा नॅरेटिव्ह जगभर तयार झाला. तो काही भारताने निर्माण केलेला नव्हता.

मात्र, या नॅरेटिव्हचा आपल्या मतदारसंघावर विपरीत परिणाम होत असल्याचे काँग्रेसच्या लक्षात आले. तेव्हा काँग्रेसने सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्यासाठी हे कारस्थान रचले.

चव्हाण तेव्हा कुठे होते?

यूपीएच्या कार्यकाळातच हिंदू दहशतवाद, भगवा दहशतवाद असे शब्द सर्रास वापरण्यात आले. आता पृथ्वीराज चव्हाण यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा रंग हा भगवा आहे हे कळले असेल, तर तेव्हा ते कुठे गेले होते, असा प्रश्नही फडणवीस यांनी उपस्थित केला.

## आज रविवारी सुरू राहणार देशभरात सर्व बँका

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सामान्यतः आर्थिक वर्षाची समाप्ती होत असताना मार्चच्या अंतिम आठवड्यात बँक सुरू ठेवले जाते.



मात्र आता ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी म्हणजे ३ ऑगस्ट सर्व बँकेच्या सर्व शाखा सुरू ठेवण्याबाबत मोदींनी आदेश दिले आहे. या आदेशानुसार, रविवारी सर्व बँक शाखेतील कर्मचारी कार्यरत राहतील.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना २०वा हप्ता वितरित करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला असून, यासाठी बँकेच्या सर्व शाखा रविवार ३ ऑगस्ट रोजी देखील खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या सूचनेनुसार २९ जुलैपासून ते ३ ऑगस्टपर्यंत लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जाणार आहे. विशेष म्हणजे, २ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पात्र शेतकऱ्यांना २०वा हप्ता वितरित केला जाईल. त्यानंतर लगेचच ३ ऑगस्ट रोजी बँक शाखा सुरू ठेवून लाभार्थ्यांना रकमेचा थेट लाभ पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाने सर्व बँकांना २९ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान शाखा कार्यरत ठेवण्यास सांगितले असून, ३ ऑगस्ट (रविवार) रोजी देखील एनईएफटी/आरटीजीएस प्रणाली कार्यरत ठेवण्याची खातरजमा करण्यात आली आहे.

यामुळे निधीचा त्वरित आणि अडथळारहित ट्रान्स्फर शक्य होणार आहे. शाखांमध्ये पुरेशा कर्मचाऱ्यांची उपस्थिती राहावी, तसेच पुरेसा निधीही उपलब्ध असावा याची दक्षता घेण्याचे निर्देश बँकेने आपल्या सर्व प्रादेशिक व नियंत्रण कार्यालयांना दिले आहेत. लाभार्थ्यांपर्यंत निधी वेळेत पोहोचवण्यासाठी ही यंत्रणा सुचारू ठेवणे आवश्यक असल्याचेही बँकेने स्पष्ट केले आहे.

## ग्रँडमास्टर दिव्याच्या यशाला सर्वोच्च सलाम!

### सरन्यायाधीश गवईंनी घरी जाऊन केले कौतुक



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :
भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात एका नव्या पर्वाची नोंद झाली आहे. नागपूरची १९ वर्षीय दिव्या देशमुख हिने फिडे वर्ल्ड वुमेन्स चेस कपच्या अंतिम फेरीत धडक मारत भारताची मान उंचावली. या अपूर्व यशासह ती ग्रँडमास्टर पदवी मिळवणारी देशातील सर्वात तरुण महिला ठरली आहे.

तिच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर दिव्याच्या घरी एक अनपेक्षित पण अत्यंत गौरवाची भेट झाली. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी तिच्या नागपूरमधील शंकरनगर चौकातील घरी प्रत्यक्ष भेट दिली आणि तिचे विशेष कौतुक केले.

दिव्याच्या घरी झालेल्या या भेटीत सरन्यायाधीशांनी तिच्या मेहनतीचं, चिकाटीचं आणि समर्पणाचं भरभरून कौतुक केलं. तू देशाला अभिमानाची आणि प्रेरणादायी भेट दिलीस. यामुळेच मी स्वतः इथे आलोय, असं सांगत त्यांनी तिच्या कुटुंबीयांचेही अभिनंदन केले.

या भेटीत दिव्याच्या आई-वडिलांनी सुरुवातीचा बुद्धिबळ प्रवास, आलेल्या अडचणी शेअर केल्या.

दिव्या देशमुखने वयाच्या पाचव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. वयाच्या ९ व्या वर्षी तिने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केलं. २०१३ मध्ये तिला वुमन फिडे मास्टरचा किताब मिळाला. बटुमी, जॉर्जियामधील वर्ल्ड कप स्पर्धेत तिने दमदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली आणि तिच्या नावावर एक नवा विक्रम नोंदवला.

सरन्यायाधीश गवई हे स्वतः विदर्भाचे असून त्यांनी याआधीही स्थानिक गुणवंतांचा सत्कार केला आहे. न्यायसंस्थेच्या सर्वोच्च स्थानावर बसलेली व्यक्ती एखाद्या खेळाडूच्या घरी जाऊन तिचं कौतुक करते, हे दृश्य फार दुर्मीळ आहे. गवईंच्या या भेटीमुळे ना केवळ दिव्या, तर तिच्यासारख्या अनेक तरुणींना बळ मिळालं आहे.

तू लाखो मुलींसाठी रोल मॉडेल आहेस. बुद्धिबळाच्या पटावर तू ज्या थंडपणे चाल खेळतेस, तीच शिस्त आणि संयम प्रत्येक क्षेत्रात आवश्यक आहे, अशा शब्दांत गवईंनी दिव्याचं मनोबल वाढवलं. दिव्या आगामी आंतरराष्ट्रीय ग्रँड प्रिक्स आणि वर्ल्ड चॅम्पियनशिप साठी तयारी करत असून, आणखी पदकांची आशा आहे.

## अनिल अंबानींना ईडीचे समन्स

### १७ हजार कोटी कर्ज घोटाळा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी यांना ईडीने ५ ऑगस्ट रोजी दिल्ली मुख्यालयात हजर राहण्याचे समन्स बजावले आहे.



१७,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कथित बँक कर्ज घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात हे समन्स बजावले आहे. कंपनीच्या काही अधिकाऱ्यांनाही समन्स बजावण्यात आले आहे. हा खटला रिलायन्स इन्फ्रा आणि त्यांच्या अनेक कंपन्यांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जांचा गैरवापर आणि आंतर-कॉर्पोरेट ठेवींच्या नावाखाली निधी वळवण्याशी संबंधित आहे.

गेल्या आठवड्यात, ईडीने अनिल ग्रुपच्या अनेक कंपन्या आणि अधिकाऱ्यांच्या जागेवर छापे टाकले. मुंबईत ३५ हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले. या जागा ५० कंपन्या आणि २५ लोकांच्या होत्या. येस बँकेकडून अंबानींच्या कंपन्यांना मिळालेल्या ३,००० कोटी रुपयांवर हे प्रकरण केंद्रित आहे.

## राज्यात खासगी मेडिकलचा ईडब्ल्यूएस कोटा रद्द

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २ :
महाराष्ट्र सरकारने खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षण लागू करण्याचा आपला पूर्वीचा निर्णय मागे घेतला आहे. राज्य वैद्यकीय शिक्षण विभागाने बुधवारी हा निर्णय घेतला. या निर्णयावर सरकारने स्पष्ट केले की केंद्र सरकार आणि संबंधित परिषदांनी विद्यमान जागा वाढवल्या तरच हा कोटा लागू होईल.

एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस, बीएचएमएस आणि बीयूएमएस अभ्यासक्रमांसाठी केंद्र सरकार, संबंधित परिषदांनी विद्यमान जागा वाढवल्या तरच हे आरक्षण लागू होईल. एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस आणि बीयूएमएस अभ्यासक्रमांव्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध जागांवरच १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षण लागू होईल .

ईडब्ल्यूएस रद्द झाल्याने विद्यार्थ्यांच्या मेरिट व गुणामध्ये फरक पडेल. ज्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे अशांना प्रवेशासाठी अडचणी येतील. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त १० टक्के कोटा उपलब्ध होणार असल्याने स्पर्धाही वाढेल.

## तुरुंगात छळ...

### साध्वी प्रज्ञा ठाकूर यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २ :
मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी एनआयएच्या विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर माजी भाजप खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी आपले अनुभव माध्यमांसमोर कथन केले.



नरेंद्र मोदी, योगी आदित्यनाथ, मोहन भागवत, सुदर्शन, इंद्रेश, रामजी माधव यांच्यासारख्या लोकांची नावे घेण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला जात होता, असा खळबळजनक दावा साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी केला. तसेच तुरुंगात माझा मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला, असा आरोपही त्यांनी केला आहे.

माझ्यावर इतके अत्याचार झाले की ते शब्दांत मांडता येणार नाहीत. एटीएस अधिकाऱ्यांनी १३ दिवस बेकायदेशीरपणे ताब्यात ठेवले. या काळात मला ज्या यातना आणि अत्याचार सहन करावे लागले, त्यासाठी शब्द अपुरे आहेत. शब्दांनाही मर्यादा असते, असे साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी म्हटले आहे.

## बलात्कार प्रकरणात प्रज्वल रेवण्णाला जन्मठेप

■ वृत्तसंस्था, म्हैसूर, दि. २ :
बंगळुरूमधील एका विशेष न्यायालयाने आज माजी जेडीएस खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवण्णाला मोलकरीण बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली. रेवण्णाला ५ लाख रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. न्यायालयाने शुक्रवारी रेवण्णाला दोषी ठरवले. रेवण्णाने आपण काहीही चुकीचे केले नाही असा दावा करत कमी शिक्षेसाठी न्यायालयात अपील केले होते.



खरं तर, रेवण्णाच्या कुटुंबाच्या फार्महाऊसवर काम करणाऱ्या ४७ वर्षीय महिलेने गेल्या वर्षी एप्रिलमध्ये त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला होता. तिने रेवण्णावर २०२१ पासून अनेक वेळा बलात्कार केल्याचा आणि घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडिओ लीक करण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता.

न्यायालयाने १८ जुलै रोजी या प्रकरणाची सुनावणी पूर्ण केली होती. रेवण्णाविरुद्ध बलात्कार, दृश्यमानता, गुन्हेगारी धमकी देणे आणि अश्लील छायाचित्रे लीक करणे यासह अनेक कलमांखाली आरोप निश्चित करण्यात आले होते. त्याच्याविरुद्ध बलात्काराचे एकूण ४ गुन्हे दाखल आहेत. त्याला दोषी ठरवण्यात आलेला हा पहिलाच खटला आहे.

## कबुतरांना दाणे टाकता? सावधान!

### कबुतरांना खायला घातल्याप्रकरणी मुंबईत पहिला गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २ :
कबुतरांची विष्ठा व पिसे यामुळे श्वसनाचा आजार होण्याची भीती असते. त्यामुळे कबुतरांना खायला घातल्याप्रकरणी मुंबईत पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दादर येथील कबुतरखाना पाडण्याच्या कामाला स्थानिकांनी जोरदार विरोध केला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने दादरच्या कबुतरखान्यात पक्षांना खाद्य टाकण्यास मनाई केली होती. त्यानंतरही या ठिकाणी खाद्य टाकले जात होते. ही बाब पुढे आल्यानंतर हायकोर्टाने त्यावर तीव्र आक्षेप नोंदवला होता. तसेच मुंबई महापालिकेला संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचेही आदेश दिले होते. त्यानुसार, शनिवारी कबुतरांना खाद्य टाकल्याप्रकरणी मुंबईत पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



माहीम येथील एका अनोळखी कार चालकाने एल जे रोडवर कबुतरांना खाद्य टाकले होते. या प्रकरणी त्याच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७० व २७१ अंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हायकोर्टाच्या निर्देशानुसार, कबुतरखान्याच्या ठिकाणी कबुतरांना खाद्य टाकल्यास संबंधितांवर ५०० रुपयांचा दंड व गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यामुळे कुणीही या ठिकाणी खाद्य टाकू नये, असे आवाहन मुंबई महापालिका व पोलिसांकडून करण्यात येत आहे. या कबुतरखान्यामुळे श्वसनाचे आजार बळावत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा कबुतरखाना बंद करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलली जात आहेत. पण दादर येथील स्थानिक व पक्षीप्रेमींनी या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे.

हा कबुतरखाना तोडण्यासाठी शुक्रवारी मध्यरात्री मुंबई महापालिकेचे एक पथक आले होते. पण यावेळी तिथे अचानक मोठा जमाव जमला. त्यांनी हा कबुतरखाना पाडण्यास तीव्र विरोध केला. यामुळे पोलिसांचा मोठा फौजफाटा याठिकाणी तैनात करण्यात आला. त्यानंतर या फौजफाट्याच्या सुरक्षेतच कबुतरखान्याच्या आवारातील पत्रे व इतर सामग्री हटवण्यात आली.

आता याठिकाणी कबुतरांच्या वास्तव्यासाठी तयार करण्यात आलेला केवळ एक पिंजरा बाकी आहे. त्यामुळे तो कधी हटवला जाणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्थानिकांनी मनपाच्या कारवाईला कडाडून विरोध केला आहे. त्यांच्या मते, आम्हाला या कबुतरांमुळे कोणताही त्रास होत नाही. या भागातील बिल्डर्सची घरे विकली जात नाहीत. त्यामुळे कबुतरखाना हटवण्याचा घाट घातला जात आहे. विशेष म्हणजे मनसेनेही या कबुतर खान्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे पुढे काय होणार? हे पाहणे रंजक ठरणार आहे.

## उद्योगासाठी जमिनी देताना शेतकऱ्यांनी कंपनीत पार्टनर व्हावे



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि. २ :
उद्योगधंद्यासाठी जमिनी मागण्यासाठी शेतकऱ्यांकडे कंपनीचे लोक आले तर शेतकऱ्यांनी नुसते जमिनी विकू नये, तर जेवढे शेतकरी आहेत, तेवढ्या शेतकऱ्यांना कंपनीमध्ये पार्टनर बनवून घेण्याची मागणी करा, असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात राज ठाकरे यांनी उपस्थिती लावली. या वेळी त्यांनी मराठीच्या मुद्यावरून भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उद्योगधंद्यासाठी जमिनी मागण्यासाठी लोक आले तर शेतकऱ्यांनी नुसत्या जमिनी विकू नये. तर जेवढे शेतकरी आहेत, तेवढ्या शेतकऱ्यांना कंपनीमध्ये पार्टनर बनवून घेण्याची मागणी करा, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले. त्या उद्योगांमध्ये आमची मुले तर कामाला लागतीलच. मात्र, फुकटच्या जमिनी न देता कंपनीमध्ये पार्टनर आम्हाला करा, अशी मागणी देखील शेतकऱ्यांनी करावी, असे ते म्हणाले.

जमिनी एकदा हातातून गेल्या तर आपल्या हातात काहीही राहणार नसल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. तसे झाले नाही तर याच रायगड मध्ये लवकरच अमराठी नगरसेवक, आमदार, खासदार निवडून येतील, अशी भीती देखील राज ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. ठाणे जिल्ह्याला अमराठी लोकांचा विळखा पडला आहे, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रातील लहान मुलांना हिंदी कशी शिकवता येईल? याचा विचार करतोय, असे राज ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्रात येणाऱ्या हिंदी भाषिकांना मराठी कशी येईल? याचा विचार मुख्यमंत्र्यांच्या मनात नाही, महाराष्ट्राचा मराठी माणूस, महाराष्ट्राचा भूमिपुत्र याचा विचारच होत नाही, याचे सर्वात विदारक आणि भीषण स्वरूप रायगड जिल्ह्यात दिसून येत असल्याचे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## मोर्चा काढायचा तर..

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई,दि. २ :
आम्ही शिवसेना आणि भाजपच्या मोर्चाला सामोरे जाण्यासाठी काँग्रेस पक्षाचे कार्यालय टिळक भवन थांबून होतो, पण त्यांचा मोर्चा आमच्या कार्यालयापर्यंत आलाच नाही. जर आले असते, तर त्यांना हू किल्ड करकरे... हे पुस्तक सप्रेम भेट म्हणून दिले असते, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी लगावला आहे.

काँग्रेसला देशभक्तीचे प्रमाणपत्र शिवसेनेने देण्याची गरज नाही. काँग्रेसचा विचार हा पाकिस्तानचे दोन तुकडे करणारा आहे तर पाकिस्तान निर्मितीच्या विचाराला पाठबळ देणारा विचार भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस) आहे, असे सपकाळ म्हणाले.



# हिंदुत्ववादी दहशतवाद म्हणा : पृथ्वीराज चव्हाण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
भगव्या दहशतवादाला भगवा दहशतवाद न म्हणता सनातन किंवा हिंदुत्ववादी दहशत वाद म्हणा, असे विधान करून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी नव्या वादाला फोडणी दिली आहे. त्यांच्या या विधानाचे देशाच्या राजकारणात तीव्र पडसाद उमटत आहेत. विशेषतः मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेने मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला आहे.



एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा मुंबईत मोर्चा

पृथ्वीराज चव्हाण यांनी शुक्रवारी वृत्तसंस्थेशी संवाद साधला होता. त्यात त्यांनी मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी विशेष एनआयए कोर्टाने दिलेल्या निर्णयावर भाष्य करताना कथित भगव्या दहशतवादावर भाष्य केले होते. माझी व भाजप व काँग्रेसच्या लोकांना नम्र विनंती आहे की, कृपया भगवा दहशतवाद हा शब्द वापरू नका. कारण, भगवा रंग हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढ्याचा हा ध्वज (भगवा) आहे. भगवा रंग हा संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व वारकरी पंथाचा रंग आहे. तो महाराष्ट्राला प्रिय आहे.

त्याला कुणीही राजकीय लेबल लावू नका. म्हणायचेच असेल तर सनातनी म्हणा, हिंदुत्ववादी म्हणा, पण भगवा म्हणू नका, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचे आता देशाच्या राजकारणात संतप्त पडसाद उमटत आहे. विविध हिंदुत्ववादी संघटनांनी या प्रकरणी त्यांच्याविरोधात रान पेटवले आहे. सत्ताधारी शिवसेनेचे शेकडो कार्यकर्ते शनिवारी या प्रकरणी मुंबईत रस्त्यावर उतरले. त्यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्याविरोधात जोरदार निदर्शने केली. एवढेच नाही तर काँग्रेसच्या कार्यालयावर मोर्चाही काढला. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात होता. या मोर्चात शिंदे गटाच्या नेत्या शायना एन सी, मनिषा कायंदे, शितल म्हात्रे यांच्यासह विविध नेते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांच्याविरोधात जोरदार नारेबाजी करण्यात आली. शिवसेना नेत्या शायना एन सी यांनी यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. महाविनाश आघाडी केवळ तुष्टीकरणाचे राजकारण करते.

हिंदूंचा अपमान करणे हेच त्यांच्या डीएनएमध्ये आहे, असे त्या म्हणाल्या. दुसरीकडे, ठाण्यातही युवा सेनेने आपले कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या नेतृत्वात या प्रकरणी आंदोलन केले. यावेळी आंदोलकांच्या हातात गर्व से कहो हम हिंदू है, चे फलक दिसून आले. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तरुण आमदार रोहित पवार यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे. ते आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, भगवा हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा, भावनेचा आणि परंपरेचा विषय असल्याने भगवा शब्दाला दहशतवादाशी कुणीही जोडू नये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी मांडलेल्या या भूमिकेत चूक काय? योग्य भुमिकेच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या भाजपा आणि शिंदे साहेबांच्या पक्षातील लोकांनी कोणत्या मुद्द्यांवर आंदोलन करावं याचा आधी अभ्यास केला पाहिजे. आंदोलन करायचंच असेल तर राज्यात रोज आठ शेतकरी आत्महत्या करतायेत.. शेतकरी कर्जमाफी, महिला सुरक्षा, बेरोजगारी, सरकारचा भ्रष्टाचार, बेलगाम सरकारचे बेफाम मंत्री या मुद्द्यांवर आंदोलन करा. शिंदे साहेबांनी आणि फडणवीस साहेबांनी त्यांच्या पक्षाच्या गोंधळलेल्या आणि काहीही काम नसलेल्या कार्यकर्त्यांना-नेत्यांना मार्गदर्शन करावं, असे त्यांनी म्हटले आहे.

# अटक करून दाखवाच

## राज ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
अर्बन नक्षली म्हणून अटक करून दाखवाच, असे आव्हान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. त्यावरून फडणवीस यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. जो कायद्याने राहतो, त्याला अटक करण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र, कायदा न वाचता आलेली ही कॉमेंट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. तुम्ही अर्बन नक्षली सारखे वागाल तर तुम्हालाही अटक होईल, अशा शब्दात फडणवीसांनी सुनावले आहे.

तुम्ही एखाद्या प्रकल्पाला विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते. त्यासाठी तुम्हाला अर्बन नक्षली ठरवण्यात येत आहे. मात्र, मराठी माणसाच्या थडग्यावर तुम्हाला उद्योग उभे करू देणार नाही. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसाचा सन्मान ठेवावाच लागेल, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला आहे. एखाद्याला अर्बन नक्षली म्हणून अटक करून दाखवाच, असे आवाहन देखील राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. यावरुन फडणवीस यांनी राज ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले आहे.

राज्य सरकारने नवीन कायदा आणला आहे. तुम्ही कोण तर म्हणे शहरांमध्ये राहणारे नक्षली. तुम्ही जर एखाद्या प्रकल्पाला विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते. मात्र, एकदा अटक करून दाखवाच, असे आव्हान राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. या महाराष्ट्रामध्ये मराठी माणसाच्या थडग्यावरती उद्योग उभे राहू देणार नाही. उद्योग आणायचे असेल तर मराठी माणसाचा मानसन्मान ठेवूनच ते उद्योग महाराष्ट्रात आणावे लागतील. त्याशिवाय तुम्हाला ते आणता येणार नसल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

राज ठाकरे यांच्या या आव्हानाला देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मी त्यांना का अटक करू? असा प्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे. हा कायदा न वाचता अशी टीका केली जात असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तुम्ही जर अर्बन लक्षली सारखे वागत नाही, त्यामुळे तुम्हाला अटक कराण्याचा प्रश्नच येत नाही. जे लोक कायद्याच्या विरोधात वागतील, त्यांच्याकरता तो कायदा तयार झाला आहे. आंदोलकांविरुद्ध कायदा नाही.

# वाकडे काम करून नियमांत बसवण्याचे काम करणाऱ्यांचीच नोंद ठेवली जाते

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
वादग्रस्त विधानांमुळे कायम चर्चेत राहिलेल्या माणिकराव कोकाटेंची कृषिमंत्रीपदावरून उचलबांगडी करण्यात आली. त्यांचे खाते मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे सोपवण्यात आले. पण आता कृषिमंत्री होऊन 24 तास लोटत नाहीत, तोच भरणे यांनी एक वादग्रस्त विधान करून कृषिमंत्री पदावरून सुरू असणाऱ्या वादग्रस्त विधानांच्या मालिकेची परंपरा कायम ठेवली आहे.


कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे वादग्रस्त विधान

माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आपल्या वादग्रस्त विधानांमुळे कायम चर्चेत राहिले. त्यांचा विधिमंडळात ऑनलाईन रमी खेळण्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महायुती सरकारवर टीकेची झोड उठली. त्यानंतर शिक्षा म्हणून त्यांचे कृषिखाते काढून घेण्यात आले. त्यांच्या जागी अजित पवार यांचे विश्वासू मंत्री दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीमुळे कृषि खात्यात काही विधायक बदल होतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. पण कृषिमंत्र्यांच्या खुर्चीत बसताच भरणेंनी पहिल्याच कार्यक्रमात वादग्रस्त विधान करून एकच धुरळा उडवून दिला आहे.

कारखान्याचा संचालक म्हणून सरळ काम तर सगळेच करतात. पण वाकडे काम करून पुन्हा ते नियमात बसवतो, त्याचीच लोक नोंद ठेवतात, असे कृषिमंत्री भरणे एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले. त्यानंतर त्यांच्या या विधानाची राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली. अनेकांनी कृषिमंत्रीपदावर बसलेल्या व्यक्तीने आपल्या वादग्रस्त विधानांची परंपरा कायम ठेवल्याची भावना व्यक्त केली.

तर काहींनी त्यांना यापुढे सावध राहून बोलण्याचा सल्ला दिला. विशेषतः विरोधकांनी वाकडे काम केल्यानंतर ते नियमात कसे बसवता येते? असा खोचक सवाल त्यांना केला. तसेच कृषी खात्यात आता वाकडे काम होणार की काय? असा टोलाही हाणला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणी दत्तात्रय भरणे यांच्यावर निशाणा साधला आहे. ते कृषिमंत्र्यांना उद्देशून म्हणाले, तुमचे हे पहिलेच विधान आहे आणि ते ही एवढे घातक आहे. तुम्ही काय म्हणालात की, वाकडी कामे सुद्धा आपल्याला करावी लागतात. उलट अशा नेत्यांची मालमत्ता, संपत्ती पाहिली की ती ताडासारखी सरळ वाढताना दिसते.

# परभणीच्या नवा मोंढा पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात खुनाचा गुन्हा दाखल

**सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची याचिका फेटाळल्यानंतर उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार परभणीच्या नवा मोंढा पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या सर्व प्रकरणाचा तपास सीआयडी कडे वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे आता वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर आणि सोमनाथ सूर्यवंशी यांचे कुटुंबीय काय भूमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे आता नेमके कोणते पोलिस अधिकारी दोषी आहेत? याची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे.

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी उच्च न्यायालयाने पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने देखील या प्रकरणात उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवले आहेत. ॲड. प्रकाश आंबेडकर हे संदर्भात बाजू मांडत आहेत.

या संदर्भात प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले होते की, महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध विजयबाई वेंकट सूर्यवंशी या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने आमच्या बाजूने निकाल दिला आहे आणि उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.

# बनावट नोटा रॅकेट उघडकीस, ८८ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर, दि. २ :
छत्रपती संभाजीनगर शहराजवळ बनावट नोटा तयार करणारा कारखाना आणि या नोटा बाजारात वितरित करणाऱ्या रॅकेटचा पदार्फाश अहिल्यानगर तालुका पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली असून, मुख्य सूत्रधार अद्याप फरार आहे. पोलिसांनी ५०० रुपयांच्या बनावट नोटा ज्याची एकूण रक्कम ५९ लाख ५० हजार आहे, तसेच २ कोटी १६ लाख रुपयांच्या बनावट नोटा तयार होऊ शकतील, असा कागद, अत्याधुनिक छपाई यंत्रे यासह एकूण ८८ लाख २० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईबाबत माहिती देताना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. पोलिसांचा हा मोठा तपास आणि कारवाईमुळे बनावट नोटा रॅकेटला मोठा धक्का बसला आहे. बनावट नोटा प्रकरणात पोलिसांनी सात जणांना अटक केली असून, अटक करण्यात आलेल्यांमध्ये निखिल शिवाजी गांगर्डे (वय २७, रा. कोंभळी, ता. कर्जत), सोमनाथ माणिक शिंदे (वय २५, तपोवन रस्ता, अहिल्यानगर), प्रदीप संजय कापरे (वय २८, तिंतरवणी, शिरूर कासार, बीड), मंगेश पंढरी शिरसाठ (वय ४०, शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर), विनोद दामोदर अरबट (वय ५३, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर), आकाश बनसोडे (वय २७, निसर्ग कॉलनी, पेठेनगर, छत्रपती संभाजीनगर) आणि अनिल सुधाकर पवार (वय ३६, मुकुंदनगर, छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे. मुख्य सूत्रधार अंबादास रामभाऊ ससाने (रा. शहरटाकळी, शेवगाव, अहिल्यानगर) सध्या फरार असून, त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# अल्का भुजबळ यांचा सन्मान



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
गेली ५ वर्ष न्यूज स्टोरी टुडे पोर्टल ची निर्मिती करणाऱ्या अलका भुजबळ यांनी, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत,वयाच्या ६२ व्या वर्षी नुकतेच न्यूज स्टोरी टुडे यू ट्यूब चॅनल सुरू केले आहे. या बद्दल त्यांचा सानपाडा जेष्ठ नागरिक संघाच्या मासिक आनंद मेळ्यात संघाचे अध्यक्ष मारुती कदम, संघाच्या उपाध्यक्षा डॉ. विजया गोसावी आणि दुसऱ्या जेष्ठ सदस्या भानुमती शाह यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. न्यूज स्टोरी टुडे या यू ट्यूब चॅनेलवर "ओळख" या सदरात पहिलीच मुलाखत ही दोन विशेष मुलांची आई असलेल्या सौ अर्चना पाटील यांची घेण्यात आली आहे.

अर्चना पाटील यांची मुलगी कर्णबधिर असूनही आज ती आंतरराष्ट्रीय कीर्तीची भरतनाट्यम नृत्यांगना आहे. अलका भुजबळ यांनी घेतलेल्या या मुलाखतीत अर्चना पाटील यांनी त्यांची, त्यांची पतीची जिद्द, मुलांचा प्रतिसाद आणि नातेवाईकांचा झालेला असह्य त्रास हा सर्व संघर्ष अतिशय निर्लेपपणे उलगडून दाखविला आहे.

# पुण्यात दादागिरी वाढली

## दौंडमध्ये गडबड करणाऱ्यांना रोखा : सुप्रिया सुळे

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :
राज्यात गुन्हेगारी वाढत असल्याबद्दल खासदार सुप्रिया सुळे यांनी पुन्हा एकदा शिंदे सरकारवर सडकून टीका केली आहे. पुणे, बीडसह दोन-तीन जिल्ह्यांमध्ये सातत्याने गुन्हे वाढत आहेत. पोलिस वर्दी ची भिती उरलेली नाही, लोकांना न्याय मिळत नाही. कोण आहे यामागे? याचा शोध घेण्याऐवजी सरकार मौन बाळगते, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.



दौंडमधील यवत गावात काल दोन गटांत निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सुळे बोलत होत्या. सुळे म्हणाल्या की, दौंड एक सुसंस्कृत, शांतताप्रिय तालुका आहे. पण बाहेरून काही लोक येऊन इथे समाजात तेढ निर्माण करत असतील, तर त्यांना रोखा. पालकमंत्री अजितदादांना मी विनम्र विनंती करते. दौंडने तुम्हाला खूप प्रेम दिलं आहे. त्यामुळे दौंडमध्ये गडबड होणार नाही याची जबाबदारी तुमची आहे, असा इशारा त्यांनी दिला.

सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, दौंडशी अनेक वर्षांपासून आमचे कौटुंबिक नातं आहे. काल स्थानिक आमदार राहुल कुल यांच्याशीही सविस्तर चर्चा झाली. राजकीय मतभेद असले तरी त्यांनी सहकार्याची भावना दाखवली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री स्वतः म्हणतात पुण्यात दादागिरी वाढली आहे. त्यामुळे गुंतवणूक येत नाही. मग तुम्ही कारवाई का करत नाही? जबाबदारी कोणाची? असा थेट सवाल सुळे यांनी उपस्थित केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, 4900 कोटींचा भ्रष्टाचार लाडकी बहिण योजनेत झाला आहे. एवढा मोठा जनादेश मिळाल्यानंतर हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करत आहे आणि इकडे मंत्री वाचाळपण करण्यात व्यस्त आहेत. हे सरकार देशातील सगळ्यात दुर्दैवी उदाहरण ठरत आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बिहारमध्ये निवडणूक आयोग पारदर्शकपणे काम करत नाही.

# शेतकरी, कामगार असेपर्यंतच महाराष्ट्र आपल्या हातात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्यातून सत्ताधारी महायुतीवर कडाडून हल्ला चढवला. आज महाराष्ट्रात शेतकरी व कामगार हे दोघेही संकटात आहेत. हे दोघे आहेत तोपर्यंतच महाराष्ट्र आपल्या हातात आहे आणि हेच या सरकारला नको आहे, असे ते म्हणालेत. कष्टकऱ्यांच्या कष्टामुळेच देवेंद्र फडणवीस आजचा महाराष्ट्र भोगत आहेत, असेही राऊत यावेळी म्हणाले.


संजय राऊत यांचा इशारा

शेतकरी कामगार पक्षाचा आज 78 वा वर्धापन दिन आहे. या निमित्ताने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्याला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह संजय राऊत उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राऊत यांनी उपरोक्त घणाघात केला. ते म्हणाले, आज या राज्यात शेतकरी आणि कामगार हे दोघेही संकटात आहे. . मुंबईसह महाराष्ट्र जो स्थापन झाला, तो फक्त गिरणी कामगार, शेतकरी, कष्टकरी आणि त्यांचा लालबावटा सर्वात पुढे होता. स्वातंत्र्याच्या लढ्यात भाजप नव्हता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघही नव्हता.

# सिएमआर तांदूळ जमा करणाऱ्या गोडाऊनमधुन पुरवठा करण्यात येत असलेल्या तांदळाची चौकशी करा

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २ :
अतिदुर्गम, अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यातील नागरीकांना शासकीय स्वस्त धान्य दुकानातून पौष्टिक तांदळाचा पुरवठा करण्यात यावा करीता स्थानिक राईसमिलर्सना अटी व शर्थिच्या अधिन राहुन शासकीय धान भरडाई करीता देण्यात येत आहे.तयार होणारा सिएमआर तांदुळ जमा करण्याकरीता शासकीय गोडाऊन रिकामे असतांना सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता खाजगी गोडाऊन किरायाने घेऊन यावर शासनाचे लाखो रुपये उधळले जात आहेत. मात्र सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता किरायाने घेण्यात आलेल्या देसाईगंज तालुक्यातील गोडाऊन मधुन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा केल्या जात असल्याची गंभीर बाब चव्हाट्यावर येऊ लागल्याने संबंधित गोडाऊन मधुन पुरवठा करण्यात येत असलेल्या तांदळाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

केलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज तालुक्यातील खाजगी गोडाऊन मालकांचे सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता दोन गोडाऊन किरायाने घेण्यात आले आहेत. यात आकाश अग्रवाल गोडाऊन नैनपुर (वडसा) व पंकज मोटवानी गोडाऊन कुरुड यांचा समावेश आहे. शासन नियमानुसार या गोडाऊन मधुन पुरवठा करण्यात येत असलेला तांदूळ नवीन पोत्यात मिलचा शिक्का असलेला व त्याचेवर फोटीफाईड स्टिकर,बॅच नंबर, उत्पादन तारीख,लॉट नंबर व राईसमिलचे नाव टाकून तांदूळ शासनाला पुरवठा करणे अनिवार्य करण्यात आले आहे.मात्र उपरोक्त गोडाऊन मधुन या सर्व नियमांना बगल देत सिएमआर तांदुळ शासन जमा करण्यात येत आहे.

जमा करण्यात येत असलेल्या तांदळाच्या पोत्यावर राईसमिलच्या नावाचा शिक्का मारल्या जात नसून ९९ किलो सिएमआर तांदळात १ किलो फोटीफाईड तांदुळ मिसळणे आवश्यक असतांना तांदुळ मिसळले जात नसुन पोत्यावर लावलेल्या स्टिकरमध्ये कोणतीच माहिती भरल्या जात नाही. जमा करण्यात येत असलेल्या तांदळाची शारीरिक अथवा रासायनिक गुणवत्ता तपासली जात नसुन दोन ते तीन वर्षे जुना,मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ शासन जमा करण्यात येत आहे.

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता शासकीय गोडाऊन उपलब्ध असतांना राईसमिलर्स यांना सिएमआर तांदळात गैरव्यवहार करता यावा करीता देसाईगंज तालुक्यातील वडसा येथील राईसमिल परिसरातीलच आकाश अग्रवाल गोडाऊन व कुरुड येथील पंकज मोटवानी गोडाऊन यांची आवश्यकता नसतांना किरायाने घेऊन शासनाचे लाखो रुपयाचे आर्थिक नुकसान केले जात आहे.विशेष म्हणजे तांदळाच्या पोत्यावर लाल रंगाचा पट्टा असणे आवश्यक असतांना जुनाट पोत्यातुन मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा सर्रास पुरवठा केल्या जात आहे.

हे सर्व काम पुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांच्या संगनमताने करण्यात येत असल्याने या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात यावी,तसेच शासनाचा लाखो रुपयाचा नुकसान टाळण्यासाठी व सिएमआर मिलींग मधिल गैरव्यवहार थांबविण्यासाठी उपरोक्त दोन्ही गोडाऊनचे करारनामे रद्द करण्यात यावे व गोडाऊनचे अनाधिकृत करारनामे करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून शासनाची झालेल्या नुकसानीची वसुली करण्यात यावी अशी मागणी कऱ्हाडे यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केली आहे. गोरगरीबांच्या जीवनाशी खेळण्याचा हा सर्रास प्रकार असल्याने याबाबत प्रधान सचिव काय कारवाई करतात,याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# लाडक्या बहिणींना मिळणार रक्षाबंधनाची भेट : अदिती तटकरे

## जुलै महिन्याचा १५०० रुपयांचा लाभ लवकरच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
लाडकी बहिण योजना ही राज्य सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना असून, तिच्या माध्यमातून पात्र महिलांना दरमहा 1500 रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. जुलै महिन्याच्या सन्मान निधीबाबत महिलांमध्ये उत्सुकता होती की, पैसे नेमके कधी मिळणार. आता यासंदर्भात प्रतीक्षा संपली आहे.

मंत्री अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहिण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थी महिलांना जुलै महिन्याचा 1500 रुपयांचा सन्मान निधी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला वितरित करण्यात येणार आहे. त्यामुळे या निर्णयामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत सर्व पात्र लाभार्थी महिलांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येस जुलै महिन्याचा 1500 रुपयांचा सन्मान निधी वितरित करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. या निधीचे थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने सर्व पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये रक्कम जमा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निर्णयामुळे रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महायुती सरकारने जुलै 2024 पासून सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महिलांसाठी एक महत्त्वाची आर्थिक मदतीची योजना ठरली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा 1500 रुपये सन्मान निधी दिला जातो. तसेच, पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरमहा 500 रुपयांची मदत दिली जाते.

जुलै महिन्याच्या हप्त्याचे वितरण करण्यासाठी राज्य सरकारने 2984 कोटी रुपयांचा निधी वर्ग केल्याची माहिती शासन निर्णयात देण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी महायुती सरकारने एकूण 28290 कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्यापैकी 2984 कोटी रुपये जुलै महिन्याच्या सन्मान निधीच्या वितरणासाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जुलै महिन्याचा हप्ता वितरित करण्यासाठी सरकारने निधी वर्ग करण्यास मंजुरी दिल्यामुळे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना येत्या दोन ते तीन दिवसांत जुलै महिन्याचा 1500 रुपयांचा सन्मान निधी मिळण्याची शक्यता आहे. या योजनेअंतर्गत 21 ते 65 वयोगटातील महिलांना दरमहा 1500 रुपये दिले जातात.

मिळालेल्या माहितीनुसार, जुलै महिन्याचा म्हणजेच योजना सुरू झाल्यापासूनचा 13 वा हप्ता लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात थेट जमा केला जाईल. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर हा हप्ता वेळेवर मिळणार असल्याने महिलांमध्ये समाधानाचं वातावरण आहे.

# एसटी बसमध्येच प्रवाशावर कोयत्याने वार

■ महासागर प्रतिनिधी, बारामती, दि. २ :
पुण्यात कोयता गॅंगने चांगलीच दहशत माजवली आहे. गेल्या काही महिन्यात कोयता गॅंगचे अनेक प्रकरण समोर आली आहेत. त्यात आता बारामती परिसरात देखील एक धक्कादायक घटना घडली आहे. बारामतीवरून इंदापूरला जात असलेल्या एसटी बसमध्ये एका प्रवाशावर कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. बारामती येथून इंदापूरला जाणाऱ्या एका एसटी बसमध्ये प्रवाशावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. तसेच आरोपीने स्वतःवर देखील कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाची अधिकची माहिती अशी की, इंदापूर आगाराची एसटी बर बारामतीहून इंदापूरच्या दिशेने निघाली होती. बस जेव्हा काटेवाडी परिसरात पोहोचली, त्यावेळी मागच्या सीटवर बसलेल्या तरुणाने शेजारील प्रवाशावर अचानक कोयत्याने हल्ला चढवला. रक्तबंबाळ अवस्थेत बसमधून उतरून निघून गेला.

# पंचबोल पॉईटवर मद्यधुंद पर्यटकांना चोपले

## आरडा ओरडा घालुन घालीत होते धिंगाणा | पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा,( दि.2 )** - येथील पंचबोल पॉईंट येथे शनिवार (1 ऑगस्ट) रोजी रात्री 10 वाजताच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत काही इसमांनी गोंधळ घातल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक करून त्यांच्याविरुद्ध कलम 185(1) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोउनि शुभांगी गजाननराव ठाकरे यांना माहिती मिळाली की, पंचबोल पॉईंट येथे काही इसम दारू पिऊन धुमाकूळ घालत आहे. या माहितीच्या आधारावर सपोनि प्रविण पाटील, पोउनि ठाकरे,



पोलीस कर्मचारी श्रीकांत खानंदे, समीक्षा मुळे यांनी खाजगी वाहनाने घटनास्थळ गाठले. तेथे चार ते पाच इसम जोरजोरात गाणी म्हणत, आरडाओरडा करताना दिसून आले. यावेळी काही उपस्थित लोकांनी या धिंगाणेखोराना चोप दिला. धिंगाणेखोरांमध्ये धनराज ज्ञानेश्वर रावेकर (42), विजय मारोतराव मदने (55), संजय रामदास रावेकर (44), सुनिल दत्ताजी कराळे (33), नरेश बाळासाहेब मदने (38, सर्व रा. अमरावती) यांचा समावेश होता. घटनास्थळी उपस्थित असलेल्या दोन नागरिकांना पंच म्हणून घेऊन पंचनाम्यातून कारवाई करण्यात आली. त्यांच्या विरुद्ध कलम 185(1) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.

# पतीनेच केला महिला पोलिस आशा तायडे यांचा खुन

## मित्रांना दिली सुपारी, दोन्ही कॉन्ट्रॅक्ट किलर पसार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )**- शहरातील गुरूकृपा कॉलनी येथे शुक्रवारी (दि. 1 ऑगस्ट) सायंकाळी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलिस कर्मचारी आशा राहूल तायडे (35) यांचा संशयास्पद मृत्यू झाला.

सुरुवातीला ही घटना चोरीदरम्यान खून झाल्याची असल्याचे भासत असतानाच, पोलिस तपासात धक्कादायक माहिती उघडकीस आली. आशा



यांच्या खुनामागे त्यांचे पती राहूल भाऊराव तायडे (39), एसआरपीएफमधील शिपाई, यांचा हात असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याने



पत्नीच्या खुनासाठी दोन मित्रांना सुपारी दिल्याची कबुली दिली असून, संबंधित दोन्ही कॉन्ट्रॅक्ट किलर सध्या फरार आहेत.

### प्रेमसंबंधामुळे खून

तपासात समोर आले की, राहूल तायडे यांचे एका महिलेसोबत प्रेमसंबंध होते. पत्नी आशा यांना याची कल्पना होती. त्यामुळे पती-पत्नीमध्ये सातत्याने वाद होत होते. सन 2020 मध्ये आशा यांनी पतीविरुद्ध तक्रार दिली होती, मात्र दोन मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी पतीसोबतच राहण्याचा निर्णय घेतला. पत्नी वारंवार वाद घालत असून ती त्याच्या प्रेमसंबंधात अडथळा आणत असल्यामुळे राहूलने तिचा खून करण्याची सुपारी दिली. कॉन्ट्रॅक्ट किलरने शुक्रवारी घरात प्रवेश करून आशा तायडे यांना गळफास देऊन मारले. नंतर घटनास्थळावरून पसार झाले.

### न्यायालयीन कारवाई व तपास

राहूल तायडेला पोलिसांनी अटक करून शनिवारी न्यायालयात हजर केले असता त्याला 4 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. दोन्ही कॉन्ट्रॅक्ट किलर अजूनही फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनाखाली डीसीपी गणेश शिंदे, एसीपी कैलाश पुंडकर, गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण व गोरखनाथ जाधव, फ्रेजरपुरा ठाणेदार रोषण शिरसाठ, एपीआय मनिष वाकोडे आणि त्यांच्या पथकाने केला. 24 तासांच्या कठोर प्रयत्नांनंतर या खुनाचा मास्टरमाइंड पतीच असल्याचे उघड झाले.

### आरोपी कोठडीत

राहुल तायडे याला पोलिसांनी अटक केली असून 4 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी मिळवली आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. फरार आरोपींचा शोध घेतला जात असून फोन रेकॉर्ड, सीसीटीव्ही फुटेज आणि आर्थिक व्यवहार तपासले जात आहेत.

### घटना कशी घडली ?

शुक्रवारी सायंकाळी पाच ते सहा वाजताच्या सुमारास आशा तायडे घरात एकट्याच होत्या. पती राहूल तायडे मुलीला ट्युशन क्लासला सोडायला गेला होता तर मुलगा शाळेत होता. मुलगा सहा वाजता परत आला तेव्हा त्याला दोन अनोळखी व्यक्ती घरातून बाहेर जाताना दिसले. घरात जाऊन आईला हाक मारली असता ती बेडरूममध्ये अत्यवस्थ अवस्थेत पडलेली दिसली. त्याने तत्काळ घराच्या पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरूंना माहिती दिली. भाडेकरूंनी राहूल तायडे यांना कळवले. आशा यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरुवातीला चोरीसाठी घुसलेल्या लुटारूंनी गळफास देऊन खून केल्याची चर्चा होती. मात्र घटनास्थळी पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, डीसीपी गणेश शिंदे आणि इतर अधिकाऱ्यांनी तपास केला असता काही बाबी संशयास्पद वाटल्या. मुलाकडून मिळालेल्या माहितीनंतर तपासाची दिशा बदलली. पोलिसांनी राहूल तायडेला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने कबुली दिली नाही, पण चौकशीत त्याचा सहभाग स्पष्ट झाला.

# बसमध्ये चढतांना सोनसाखळी चोरी

**अंजनगाव सुर्जी** - बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत एका चोरट्याने 75 वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरले. सदर घटना शुक्रवारी दुपारी 1.40 वाजताच्या सुमारास अंजनगाव सुर्जी आगाराच्या आवारात घडली. परतवाडा येथील मिल कॉलनी परिसरात राहणाऱ्या ताईसाहेब महादेवराव (वय 75) या अंजनगाव सुर्जी बसस्थानकातून परतवाडा येथे जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना, गर्दीचा फायदा घेत चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे 95 हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र लंपास केले. याप्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

# कोल्ह्याच्या हल्ल्यात वृद्ध शेतमजूर गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि.2)** - जरूड येथील 62 वर्षीय आदिवासी शेतमजूर जोगीलाल धुर्वे यांच्यावर कोल्ह्याने अचानक हल्ला करून गंभीर जखमी केले. ही घटना बेनोडा (शहीद) परिसरातील मनोज वानखडे यांच्या शेतात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, जोगीलाल धुर्वे शेतात काम करत असताना पाणी पिण्यासाठी विहिरीकडे गेले. त्याचवेळी कोल्ह्याने झडप घालत त्यांच्यावर आक्रमण केले. अचानक झालेल्या या हल्ल्याला धुर्वे यांनी धैर्याने प्रतिकार केला. जवळपास अर्धा तास त्यांनी कोल्ह्याशी झुंज देत स्वत:चा जीव वाचवला. अखेर कोल्हा बेशुद्ध पडल्यावर त्यांचा बचाव झाला. घटनेनंतर शेतात उपस्थित संत्रा व्यापाऱ्यांनी तत्काळ मदत करत जखमी धुर्वे यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी गंभीर जखमा असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. धुर्वे हे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असल्याने त्यांच्या उपचारासाठी वनविभागाने तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी जरूड येथील सामाजिक कार्यकर्ते सोपान ढोले यांनी केली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# कर्जाच्या ओझ्याने त्रस्त शेतकऱ्याची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.2 )**- मोर्शी तालुक्यातील ब्राह्मणवाडा दिवे गावात एका 54 वर्षीय अल्पभूधारक शेतकऱ्याने कर्जाच्या बोजामुळे घरात विष प्राशन करून आत्महत्या केली. मृत शेतकऱ्याचे नाव श्रीधर ऊर्फ गजानन दिगांबर दिवे (वय 54) असे आहे. प्राप्त माहितीनुसार, श्रीधर दिवे यांच्या नावावर केवळ दोन एकर शेती होती. यावर्षी त्यांनी सोयाबीन व कपाशीची लागवड केली होती. लागवडीसाठी त्यांनी बँक व खासगी सावकारांकडून कर्ज घेतले होते. मात्र यावर्षी हवामानातील अनियमितता आणि अतिवृष्टीमुळे त्यांना पुन्हा एकदा दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर आलेल्या मुसळधार पावसामुळे त्यांची संपूर्ण शेती उद्ध्वस्त झाली. सततचे नुकसान आणि वाढते कर्ज यामुळे श्रीधर दिवे हे प्रचंड मानसिक तणावात होते. घरखर्च कसा चालवायचा, याची चिंता त्यांना सतावत होती. या तणावाखाली त्यांनी 31 जुलै रोजी स्वत:च्या घरात विष प्राशन केले. कुटुंबीयांनी व गावकऱ्यांनी त्यांना तात्काळ अमरावतीच्या जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान 1 ऑगस्टच्या रात्री त्यांचा मृत्यू झाला. 2 ऑगस्ट रोजी शवविच्छेदनानंतर त्यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आणि अत्यंत शोकाकुल वातावरणात ब्राह्मणवाडा दिवे गावात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# खुनाच्या आरोपात निर्दोष सुटताच काढली दुचाकी रॅली!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - खुनाच्या आरोपातून निर्दोष सुटकेनंतर दोन युवकांनी आनंदाचा उत्सव दुचाकी रॅली काढून साजरा केला. मात्र, परवानगी न घेता ही रॅली काढल्याने त्यांच्या जल्लोषाला कायद्याचा ब्रेक लागला. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात महाराष्ट्र पोलिस कायदा कलम 135 अंतर्गत तब्बल 10 ते 11 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सन 2021 मधील खुनाच्या प्रकरणातून प्रशिक बारसे (30) आणि विशाल गडलिंग (30, दोघेही रा. पंचशीलनगर) यांना बुधवारी न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. न्यायालयाचा दिलासा मिळताच त्यांनी समर्थकांसह आनंदोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला. गुरुवारी रात्री 7.45 ते 8.30 वाजता संजय गांधी नगर क्रमांक 2 येथून यशोदानगर चौकापर्यंत ही बिनपरवानी मोटारसायकल रॅली काढण्यात आली. प्रशिकदादा, विशालदादा आगे बढो!' अशा घोषणा देत ही रॅली चौकभर धडकली. समर्थक शुभम कैथवास, कैलास कैथवास, शिवम कैथवास (तिघेही रा. बडनेरा) व इतरांनीही यात सहभाग घेतला. मात्र, पोलिसांची पूर्वपरवानगी न घेतल्याने हा आनंदोत्सव त्यांच्याच गळ्यात कायदेशीर अडचण ठरला.

### पोलिसांची कारवाई

रॅलीबाबत माहिती मिळताच पोलिसांनी सर्वांना तातडीने ताब्यात घेत फ्रेजरपुरा ठाण्यात आणले. येथे त्यांना कडक समज देण्यात आली. पोलिसांनी स्पष्ट केले की, 'मुक्तता म्हणजे मोकळीक नव्हे!' सध्या पोलिसांनी कायद्यानुसार पुढील कारवाई सुरू केली असून, परवानगीशिवाय रॅली काढणाऱ्यांना शिक्षा होणार आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी चर्चा रंगली आहे.

# चांदीचे ताट आणि कटोरी चोरुन नेले; गुन्हा उघड

## 1.51 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )**- शहरातील जयस्तंभ चौकात खरेदीसाठी आलेल्या गृहिणीच्या मोपेड डिक्कीमधून चांदीचे ताट व कटोरी असा एकूण 66 हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना 30 जुलै रोजी घडली. अवघ्या 24 तासांत गुन्हे शाखेच्या पथकाने तपास करून आरोपीला अटक केली असून, 1.51 लाखांचा मुद्देमाल



जप्त करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रानुसार, फिर्यादी पुनम धिरज घोंगडे (वय 26, रा. आयटीआय कॉलनी, कांतानगर कॅम्प) या 30 जुलै रोजी जयस्तंभ चौकातील एकता आभूषण या दुकानातून चांदीचे ताट व कटोरी खरेदी केले. त्यानंतर त्यांनी ती पिशवी आपल्या मोपेडच्या डिक्कीत ठेवली. त्यानंतर त्या पालेकर बेकरीजवळ थांबून काही वेळासाठी दुकानात गेल्या. घरी पोहोचल्यावर डिक्की उघडली असता, चांदीचे दागिने असलेली पिशवी गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी परिसरात शोधाशोध केली, मात्र पिशवी कुठेही सापडली नाही. यावरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान 1 ऑगस्ट रोजी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी शंतनू गजानन पाटोळे (वय 21, रा. मनकरना नगर, कांबळे लेआउट) यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेऊन विचारणा केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चांदीचे ताट (487.100 ग्रॅम), चांदीची कटोरी (27.300 ग्रॅम) व गुन्ह्यात वापरलेली सुझुकी ॲचक्सेस मोपेड (एमएच 27 डीवाय 4056, किंमत 85000 रु.) असा एकूण 1 लाख 51 हजार 710 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त जयदंत्त भवर यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके, निरीक्षक (गुन्हे) रामदास पालवे, सहायक पोलिस निरीक्षक विजय गीते, पोलिस उपनिरीक्षक तुषार गावडे, रंगराव जाधव, पोलिस हवालदार हरिष बुंदेले, प्रमोद हरणे, आकाश इंगोले, बाबुसिंग राठोड यांनी केली.

# शिरजगाव कसबा येथे ई-क्लास जमिनीतून परवानगीपेक्षा अधिक मुरूम उत्खनन

## प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुरबाजार,( दि.2 )** - चांदुरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथे ई-क्लास जमिनीत सोलार प्लांट उभारण्यासाठी सपाटीकरणाच्या नावाखाली परवानगीपेक्षा कितीतरी पटीने अधिक मुरूम उत्खनन झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शासनाकडून केवळ 100 ब्रास मुरूम उत्खनन करण्यास परवानगी होती, मात्र प्रत्यक्षात शेकडो ब्रास मुरूम काढण्यात आल्याचे समोर आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, या ठिकाणी काढण्यात आलेला मुरूम एमएसआरडीसीच्या रोड बांधकामासाठी वापरण्यात आला आहे. त्यामुळे परवानगी कोणी दिली आणि ही वाहतूक कशी केली गेली, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. परवानगीपेक्षा जास्त उत्खनन केल्याने शासनाच्या महसुलाचे



मोठे नुकसान झाले असून, पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे.

### ग्रामस्थांचा आक्रोश

स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकाराविरोधात आवाज उठवला असून जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. त्यांनी सांगितले की, सपाटीकरणाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीची लूट होत आहे. प्रशासनाने त्वरित कठोर पावले उचलली नाहीत तर ग्रामस्थ आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील.

### मोजमापांपेक्षा दुप्पट उत्खनन

सध्या उत्खनन क्षेत्राची पाहणी केली असता ठरवलेल्या मर्यादेपेक्षा दुप्पटपेक्षा अधिक क्षेत्रात मुरूम काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले. महसूल, पर्यावरण आणि खनिकर्म विभागाकडून मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष झाले असून, ठेकेदार व स्थानिक अधिकाऱ्यांमधील संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे.

### प्रशासन मौन

या प्रकरणी तहसील प्रशासन आणि जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. मात्र, माध्यमांमध्ये बातमी आल्यानंतर वरिष्ठ स्तरावरून चौकशीचे संकेत मिळाले आहेत. जिल्हाधिकारी यांनी यावर तातडीने चौकशीचे आदेश दिल्याची माहितीही समोर येत आहे.

### गंभीर परिणामाची शक्यता

या प्रकारामुळे शासन महसूल, पर्यावरण आणि जमिनीच्या वापरावर गंभीर परिणाम होणार असल्याचे स्पष्ट आहे. स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाच्या कार्यपद्धतीबद्दल प्रचंड नाराजी असून, वेळेत कठोर कारवाई न केल्यास अशा घटना रोखणे कठीण होईल, अशी भावना व्यक्त होत आहे. पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. हा प्रकार केवळ महसूल हानीचा नाही तर नैसर्गिक संसाधनांच्या उघड लुटीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# श्रीनिवास पोकळेला सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार







**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि. 2 )**- चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठेचे मानले जाणारे 71 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार शुक्रवारी (1 ऑगस्ट) जाहीर करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात मराठी चित्रपटसृष्टीने पुन्हा एकदा आपली छाप उमटवली आहे.

ज्येष्ठ दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने जाहीर केलेल्या निकालानुसार, सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट हा मान सुजय डहाके दिग्दर्शित श्यामची आई याला मिळाला. तसेच बालकलाकार व तांत्रिक विभागांमध्येही मराठी कलावंतांनी आपले वर्चस्व दाखवले.

नागराज मंजुळे दिग्दर्शित नाळ 2 या चित्रपटाने राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये दुहेरी यश मिळवले आहे. या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा पुरस्कार जाहीर झाला असून, या चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी तीन बालकलाकार ङ्खश्रीनिवास पोकळे, त्रिशा ठोसर आणि भार्गव जगताप यांना सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार विभागून प्रदान करण्यात आला आहे. नाळ 2 चे दिग्दर्शन सुधाकर रेड्डी यक्कांती यांनी केले आहे. चित्रपटातील मुख्य भूमिकेत अंजनगाव बारीचा चिमुकला श्रीनिवास पोकळे झळकला. त्याच्या प्रभावी अभिनयाचे समीक्षक आणि प्रेक्षक दोघांकडून कौतुक झाले आहे. या चित्रपटातील गाणी आणि कथानकानेही प्रेक्षकांची मने जिंकली. नाळ 2 मध्ये नागराज मंजुळे यांची विशेष भूमिका असून, ट्रीशा ठोसर, दीप्ती देवी, देविका दफ्तर, जितेंद्र जोशी आणि भार्गव जगताप यांनीही महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. या पुरस्कारामुळे श्रीनिवास पोकळेचे नाव संपूर्ण देशभर गाजले असून, अंजनगाव बारीचा अभिमान वाढवला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

सध्या देशात लोकशाहीचे अक्षरशः धिंधवडे निघायला सुरूवात झाली आहे. मुंबई बॉम्बस्फोट संशयित आरोपी निर्दोष, मालेगाव बॉम्बस्फोट आरोपी कित्येक वर्षांनी निर्दोष. मग प्रश्न निर्माण होतो की, हे बॉम्बस्फोट केले तरी कुणी? सरकार कोणत्याही पक्षाचे असो, गुन्हेगाराला शिक्षा ही झालीच पाहिजे. या निकालामुळे एनआयए, एटीएस, सीबीआय, सीआयडीच्या तपासावर आता कोण विश्वास ठेवेल? यांनाच काही कळत नाही, हा संदेश देशात पोहोचला नाही का? मुंबई, मालेगाव प्रकरणातील आरोपींना निर्दोष म्हणणं म्हणजे देशाच्या न्यायव्यवस्थेचा एक प्रकारे अपमानच झाला आहे. देशातल्या इतिहासात काही दिवस असे येतात जे रक्त उकळवतात, प्रश्न विचारायला भाग पाडतात आणि न्यायाच्या चौकटी हादरवतात. मुंबई, मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता ही एक कायदेशीर लाज आणि नैतिक दिवाळखोरी आहे. कारण हे अत्यंत गंभीर स्वरुपाचे गुन्हे आहेत. यात सामान्य नागरिकांचे प्राण गेले. पण फिर्यादी पक्षाला निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे पुरावे न देता आल्याने आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत. या प्रकरणाच्या तपासाचे आणि खटल्याचे पडसाद देशभर उमटले होते, तसेच या निकालाचेही उमटण्याची शक्यता आहे. हे स्फोट कोणी घडवून आणले, हे प्रश्न एवढ्या वर्षांनी देखील अनुत्तरितच राहिले आहेत. २००८ साली मालेगावमध्ये झालेला बॉम्बस्फोट, ज्यात सहा निरपराध लोकांचा मृत्यू झाला आणि शंभरहून अधिक लोक जखमी झाले होते, त्यातीलच आरोपी निर्दोष ठरवले गेले. पण हा निकाल ऐकून एकच प्रश्न डोकं पोखरतो, मग त्या निष्पाप मृतांची शिक्षा कोण भोगणार? त्यांचं रक्त कुणाच्या हातावर? ही निर्दोष मुक्तता नाही, ही राजकीय संरक्षणाची सजा-मुक्ती वाटते. साक्षी, पुरावे, तपास, कागदपत्रं सगळं स्पष्ट होतं. पण काय झालं? सरकार बदललं आणि कायदेशीर प्रक्रिया राजकीय हेतूंनी बिघडवली गेली की काय अशी शंका येत आहे. साक्षीदार मोठ्या प्रमाणावर फुटायला सुरुवात झाली. सत्तेची ताकद काय असते हे मुंबई , मालेगाव प्रकरणात दिसून आले. काही ठिकाणी सत्ता तर काही ठिकाणी पैसा कामाला आला, ही चर्चा सर्वांनाच लाज आणणारी ठरत आहे. आरोपींच्या वकिलांना राजकीय वरदहस्त, तपास यंत्रणांवर दबाव आणि साक्षीदार फितूर हे काही योगायोग नव्हते. न्यायमंदिरात फक्त सामान्यांचं रक्त सांडतं, कारण आरोपींच्या मागे सत्तेचा व पैशाचा आशीर्वाद असतो. काहींना हा निकाल लागला असे वाटत असले, तरी अनेकांना हा न्यायद्रोहदेखील वाटत असेल तर त्यांची काय चूक आहे?

# मग मुंबई, मालेगावचे बॉम्बस्फोट केले तरी कुणी?





आरोपींना निर्दोष ठरवणं म्हणजे भविष्यात धार्मिक अंधत्वाला परवानगी देणं आहे. हे निर्णय देशाला संविधानापेक्षा धर्माच्या रेषांनी चालवण्याच्या दिशेने ढकलतात. आतंकवाद्याचं धर्म बघून न्याय ठरवायचा का? मग देशद्रोह्यांचं काय? हिंदू आतंकवादी व मुस्लिम आतंकवादी हे शब्द आलेच कुठून? आतंकवाद्यांना कधी धर्म असतो का?

हा निकाल तर असे सांगतो की, जर तुमचं सरकार मजबूत असेल, तर गुन्हा काहीही व कसाही केला तरी चालतो. जिथं हत्या, षड्यंत्र, देशविघातक कट हे देशभक्तीच्या नावाखाली निखळले जातात. हे निकाल न्यायाच्या शरमेचा कळस आहे. मालेगावच्या निकालापूर्वी मुंबईचा निकाल लागला, त्यावेळीही संपूर्ण देश हादरला. कारण मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व अकरा आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्यावर ज्या २०९ जणांनी आपले प्राण गमावले, मग त्यांना नेमके कुणी मारले हा प्रश्न निर्माण होतोच ना!

अवघ्या अकरा मिनिटांत मुंबईत खेळ झाला होता. विशेष म्हणजे चक्क १९ वर्षांनंतर या बहुचर्चित हल्ल्यातील दोषींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. पुराव्याअभावी या सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. तसेच साक्षीदारांच्या जबाबात तथ्य आढळले नाही असं कोर्टानं म्हटलं आहे. या प्रकरणी पाच जणांना फाशी तर सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

दोषींनी त्यांच्या शिक्षेला आणि शिक्षेला आव्हान दिले होते. या स्फोटांनी संपूर्ण देशाला हादरवून टाकले होते. या प्रकरणात, महाराष्ट्र एटीएसने एकूण तेरा आरोपींना अटक केली होती, तर पंधरा जणांना फरार घोषित करण्यात आले होते, ज्यापैकी बरेच जण पाकिस्तानमध्ये असल्याचा संशय आहे. फाशी काय, जन्मठेप काय साराच सावळा गोंधळ दिसत आहे. मग एवढे वर्ष काय खेळ चालू होता का?

मालेगाव प्रकरणात मृतांचे नातेवाईक पालक, भावंडं, पत्नी, मुलं यांच्यासाठी कोणता सुखद न्याय मिळाला? उद्या जर मालेगावात आणखी एक तसाच प्रकार घडला, तर जबाबदार कोणाला धरायचे ? मुंबई, मालेगावच्या निर्णयाने धार्मिक दहशतवाद्यांना एक स्पष्ट सिग्नल मिळाला आहे, की गुन्हा करा, घाबरू नका, सर्वकाही ठीक होत असते.

निकाल ऐकल्यावर ही न्यायव्यवस्थेची हत्या आहे असे वाटत नाही का? हा केवळ एक निकाल नाही, हे संविधानावर, न्यायावर आणि सर्वसामान्यांच्या आयुष्यावर उडालेले शिंतोडे आहे. जोपर्यंत देशाच्या न्यायव्यवस्थेला धर्म, सत्ता आणि जात कळत राहील, तोपर्यंत देश दिवसेंदिवस पोकळ होत राहील. मुंबई, मालेगाव किंवा अन्य ठिकाणच्या घटनांतील आरोपी ज्यावेळी निर्दोष सुटतात, त्यावेळी एक प्रश्न पडतो की, इतके दिवस ते तुरुंगात खितपत पडले होते, ते दिवस त्यांचे कसे भरून देणार ?

एकतर ते आरोपी असेल तर त्यांना तुरुंगात ठेवणे योग्यच होते. पण अचानक निर्दोष सुटल्यानंतर त्यांचा दोष नसेल तर त्यांनी भोगलेल्या तुरूंगवासास जबाबदार कोण हा ही प्रश्न पडतोच ना! या घटनेत न्याय जिंकला असे कोणालाही वाटत नाही पण एकूणच निकाल ऐकल्यानंतर संपूर्ण हिंदुस्तान हादरला ही वस्तुस्थिती आहे.

मालेगांवचा निकाल येण्यापूर्वीच काही दिवसांपूर्वी मुंबईतल्या ७/११ च्या लोकल ट्रेन स्फोट खटल्यातही सगळे आरोपी निर्दोष सुटले होते. एकाच महिन्यातल्या या दोन निकालांमुळे तपास यंत्रणांच्या पद्धतीवरही प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

मालेगावचा खटला अधिक संवेदनशील बनला आणि राजकीयदृष्ट्याही अधिक परिणामकारक ठरला. कारण पहिल्यांदाच अशाप्रकारच्या हिंसक कृत्यामध्ये हिंदुत्ववादी संघटनांशी संबंधित व्यक्तींना अटक करण्यात आली होती. त्याशिवाय लेफ्टनंट कर्नलप्रसाद पुरोहित या भारतीय लष्कराच्या सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांनाही सूत्रधार म्हणून आरोपी केलं होतं. असं यापूर्वी कधीच घडलं नव्हतं.

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६११४२०

आता प्रज्ञा सिंह ठाकूर आणि कर्नल पुरोहित यांच्यासह निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर द्विवेदी यांना आरोपांतून मुक्त करण्यात आलं आहे. त्यांची मुक्तता होताच हिंदुत्ववाद्यांनी आनंद व्यक्त केला, अगदी मुंबई बॉम्बस्फोटातील मुक्त झालेल्या आरोपींच्या समर्थकांसारखा. मुंबई बॉम्बस्फोटातील सगळ्या आरोपींना निर्दोष सोडण्याचा निकाल आल्यावर सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी दिलेल्या प्रतिक्रियेत म्हटलं आहे की, हे सगळ्यांनाच माहिती होतं की असं होईल. जर तुम्ही खरा पुरावा समोर ठेवलाच नाहीत तर यापेक्षा वेगळी अपेक्षा काय करणार?

त्यांचे म्हणणे असे की, आपण भरपूर पुरावे न्यायालयासमोर ठेवले होते आणि सर्वोच्च न्यायालयानंही ते ग्राह्य धरले होते. मग ते पुरावे कुठे गेले? असा प्रश्न सालियन यांनीच विचारला आहे. एनआयनं असं म्हटलं आहे की, त्यांच्या अगोदर दाखल झालेले पुरावे खोटे आहेत. त्यामुळे त्यांनी पुन्हा तपास केला आणि पुन्हा एकदा साक्षीदारांचे जबाब घेतले. ते जबाब अगोदर घेतलेल्या १६४ जबाबपेक्षा वेगळे होते. तो नवा पुरावा म्हणून त्यांनी कोर्टासमोर ठेवला आणि त्यावर आधारलेला निकाल बाहेर आला.

मालेगावच्या रहदारीच्या भागातल्या भिकू चौकाजवळ २९ सप्टेंबर २००८ रोजी एका दुचाकीवर बॉम्बस्फोट झाला. या घटनेत एकूण सात जणांचा मृत्यू झाला तर ९२ जण जखमी झाले होते. त्यानंतर लगेचच महाराष्ट्रातल्या तत्कालिन आघाडी सरकारनं या प्रकरणाचा तपास एटीएसकडे देण्याची घोषणा केली होती. तेव्हाचे दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख हेमंत करकरे होते.

पुढे २६/११ च्या मुंबई हल्ल्यात त्यांच्या मृत्यू होईपर्यंत तेच या तपासाचं नेतृत्व करत होते. सुरुवातीच्या तपासानुसार, ज्या दुचाकीवर स्फोटकं ठेवण्यात आली होती, ती दुचाकी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्यापर्यंत पोलिसांना घेऊन गेली. त्यांच्या आरोपपत्रानुसार अजूनही फरार असणाऱ्या आरोपी रामजी कलसांगरा यानं ती दुचाकी तिथं ठेवली होती. प्रज्ञासिंह ठाकूर यांना मध्य प्रदेशतून अटक करुन अन्य काही आरोपींनाही दहशतवाद विरोधी पथकानं नाशिक कोर्टात हजर केलं.

यादरम्यान या प्रकरणात लष्कराच्या सेवेत असलेल्या अधिकाऱ्याचा या प्रकरणात समावेश असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांना मध्य प्रदेशातून लष्करानं एटीएसच्या ताब्यात दिलं आणि त्यांना नाशिक आणि पुणे इथल्या न्यायालयांमध्ये हजर करण्यात आलं. अटकसत्र सुरू राहिलं आणि निवृत्त लष्करी अधिकारी मेजर रमेश उपाध्याय, समीर कुलकर्णी यांना अटक करण्यात आली.

इतर विविध कलमांखेरीज या सगळ्यांवर संघटित गुन्हेगारीसाठी असलेल्या 'मकोका' कायद्याची कलमंही लावली. प्रज्ञा सिंह ठाकूर, ले. कर्नल पुरोहित आणि मेजर उपाध्याय हे कटाचे सूत्रधार तर स्फोटात वापरलेली दुचाकी प्रज्ञा सिंह ठाकूर यांचीच आहे हे त्यात म्हटलं.

पण हे सर्व न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाही किंवा पुरावे सापडले नाही अथवा नष्ट करण्यात आले असावे. भारतीय न्यायालयामध्ये न्याय मिळण्यासाठी जर १९ वर्षे संघर्ष करावा लागत असेल, तर न्याय मिळाला काय अन् नाही मिळाला काय दोन्ही सारखेच आहे!

■ ■ ■

## कुठे जल्लोष तर कुठे सन्नाटा

मालेगावचा निकाल जाहीर होताच हिंदू संघटनांनी जल्लोष केला, तर मुस्लिमबहुल परिसरात खंत व्यक्त करण्यात येत होती आणि तेथेच सर्वत्र उदास चेहरे दिसत होते. स्फोटात बळी गेलेल्या सय्यद अजहर या तरुणाची आई मेहजबीनने न्यायालय निकालाविषयी म्हटले की 'जान के बदले जान हवी होती, ये तो इंसाफ नही हुआ'. पण विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी म्हटले होते की, दहशतवादाला धर्म नसतो, पण नैतिकतेच्या आधारावर कुणालाही दोषी ठरविता येत नाही. आतंकवादाला धर्म नसतो याचा अर्थ असा की, आतंकवाद ही एक अवैध, हिंसक कृती आहे, जी कोणत्याही विशिष्ट धर्माशी थेट संबंधित नाही. कोणीही, कोणत्याही धर्माचा दावा करत, जर निर्दोष लोकांवर हल्ले करतो, दहशती पसरवतो, तर तो व्यक्ती किंवा गट त्या धमार्चे प्रतिनिधित्व करत नाही. सर्व धर्म मूलतः प्रेम, शांतता, सहिष्णुता आणि मानवतेच्या कल्याणाचे उपदेशक असतात. कोणताही खरा धर्म दहशतवादाला समर्थन करत नाही. त्यामुळे जर एखादा दहशतवादी स्वतःला कोणत्याही धर्माशी जोडून घेत असेल, तरीही त्याच्या हिंसक कृत्यांना त्या धर्माची जबाबदारी लावली जाऊ शकत नाही. राजकीय किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी काही लोक धमार्चा गैरवापर करून दहशत पसरवतात. आतंकवाद्याचा धर्म नसतो; तो फक्त मानवतेचा शत्रू असतो.

---

### इन्कमटॅक्सवाल्यांनी आपले डोके लावायला पाहिजे...
# राजस्थान हायकोर्टाने ओढले ताशेरे?

आपण गेल्या अनेक आठवड्यापासून सोप्या प्रश्नोत्तर भाषेत सोनं - नाणं आणि ज्वेलरी तथा इन्कमटॅक्स याबद्दलची सविस्तर माहिती घेत आहोत.आज आपण बघणार आहोत की, माननीय राजस्थान उच्चन्यायालयाने कोणत्याप्रसंगी कुठल्या केसमध्ये सांगितले की इन्कमटॅक्स ऑफिसर यांनी आपले डोके लावायला पाहिजे.

**प्रश्न - राजस्थान हायकोर्टाने अमोरे ज्वेल्स या केसमध्ये काय टिपणी केली?**

■ अमोरे ज्वेल्स विरुद्ध प्रिन्सीपल CIT [S.B.CIVil Suit नो. १७५०८- २०१७ (Raj)] या प्रसिद्धी केसमध्ये सांगितले की, 'Income Tax Officer must show application of mind, before embarcing on search and seizure missions in the case below, there was hardly any application of mind.'

**प्रश्न - Application of mind म्हणजे नेमके काय?**

■ Application of mind चा मराठी अर्थ मनोयोजन किंवा बुद्धिचा वापर असा होतो. म्हणजेच एखाद्या गोष्टीचा विचार करणे, तिचे विश्लेषन करणे आणि योग्य निर्णय घेण्यासाठी आपल्या बुद्धिचा वापर करणे असा आहे. सोप्या भाषेत डोकं वापरणे म्हणजे एखादा निर्णय घेण्यासाठी आपल्या बुद्धीचा, ज्ञानाचा आणि अनुभव या त्रिवेणी संगमाचा उपयोग करणे होय.

**प्रश्न - वरील केसची संक्षिप्त माहिती काय आहे?**

■ वरील केसमध्ये या फर्मचे कर्मचाऱ्यांना ३ किलो सोन्यासह इंदिरा इंटरनेशनल एअरपोर्ट वर इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी पकडले व सोने जप्त केलं.

हे सोने खरेतर ज्वेल्स या हिरे जवाहरात तथा सोन्याचा व्यापार करणाऱ्याच्या कंपनीच्या मालकीचे होते. ज्वेल्स कंपनीने सांगितले की हे सोने आमचाच स्टॉक असून आमच्याकडे स्टॉक इन ट्रेड या हेडखाली आजही ५८३ आयटम आहेत. त्यांनी त्यांचा विम्याची कागद पत्रेही दाखवली.

सर्व शो केल्यानंतर सुध्दा इन्कमटॅक्सवाल्यांनी जप्ती केली म्हणून या ज्वेलरी धंद्याच्या कंपनीच्या केसमध्ये राजस्थान हायकोर्टाने ताशेरे ओढले की इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी आपल्या डोक्याचा तथा बुद्धिचा वापर केलेला नाही, असे सांगून उच्च न्यायालयाने या केसचा निकाल ज्वेल्स कंपनीच्या बाजूने दिला व इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना सोने परत देण्याचे आदेश दिले.

**प्रश्न- डायरेक्ट अरेस्ट करण्याचे अधिकार कोणत्या डिपार्टमेंटला आहे?**

■ कस्टम, सेंट्रल एक्साइज तथा एन्फोर्समेन्ट या विभागांना डायरेक्ट अरेस्ट करण्याचे अधिकार कायद्याने दिलेले आहेत. पोलीस तर अरेस्ट करू शकतातच परंतु इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना करदत्यास टॅक्स व दंड लावण्याचे अधिकार आहेत. परंतु करदत्यास डायरेक्ट अरेस्ट करण्याचे सर्वभोम अधिकार दिलेले नाही.

अपवादात्मकप्रसंगीच त्यांना हा अधिकार वापरण्याचे अधिकार असल्यामुळे सहसा इन्कमटॅक्स अधिकारीसुध्दा अरेस्टचे अपवादात्मक अधिकार वापरत नसल्याचे दिसून आले आहे.

सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.





इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम १३२ मध्ये सर्च अँड सीझरचे त्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यांना काय अधिकार आहेत, हे आपण पुढे बघणार आहोत, जे व्यवहारात खुप उपयोगी आहे.

पुढील लेखमालेतील अभ्यासात आपण अत्यंत महत्वाची सोन्याबदलचीच नवीन माहिती बघणार आहोत. त्यात सर्व्हे करण्यासाठी आलेले इन्कमटॅक्स अधिकारी त्या चौकशी (सर्व्हे) चे रुपांतर धाडीत करू शकतात का? कोणत्या प्रसंगी ते धाडीत रुपांतर करू शकतात? इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना धाडीत काय काय अधिकार असतात हे जाणून घेणे आपल्या हिताचे असल्यामुळे याची सविस्तर माहितीसुध्दा पुढे बघणार आहोत.

ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील, त्यांनी ९४२२२१८४२८ वर फक्त व्हॉटसॲप करावे म्हणजे पुढे लेखमालेत त्यांची उत्तरे निःशुल्क दिली जातील.

■ ■ ■

---

## ऑनलाइन जुगाराचा सापळा

वाचक लिहितात

इतक्यात ऑनलाइन जुगाराच्या जाहिराती विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणात बघायला मिळतात. त्याचे परिणामही तसेच गंभीर आहेत. ऑनलाईन जुगारात पैसे हरल्याने अनेकांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या वारंवार ऐकायला मिळत आहेत.

दुर्दैव म्हणजे केवळ अजाण वयातील किशोर मुलेमुलीच नाही तर अनेक प्रौढ सुद्धा या जाळ्यात अडकले आहेत. सुरुवातीला लोकांना आकर्षित करण्यासाठी काही पैसे दिले जातात आणि त्यानंतर ती व्यक्ती त्या ऑनलाइन गेमिंगच्या दुष्टचक्रात फसत जाते.

आता हरलो तरी पुढे जिंकणारच आहोत, सर्व नुकसान भरून काढू, या विचाराने अधिकाधिक पैसे त्यात गुंतवले जातात आणि जेव्हा हातात काहीच उरत नाही तेव्हा मग आत्महत्या हाच एकमेव पर्याय त्यांना वाटतो. परंतु जो संयम आणि आशेचा किरण जुगारात पैसे मिळण्यासाठी दिसतो, तोच संयम आणि आशा व्यवहारात मेहनतीचे काम प्रामाणिकपणे करतांना दाखवल्यास जीवनात नक्कीच यश मिळेल, पण तसे होताना दिसत नाही.

मानवी जन्म दुर्लभ आहे. तो या असल्या जुगारात हरलो म्हणून आत्महत्या करण्यासाठी निश्चितच नाही. आपले ध्येय हे उच्च असायला हवे , तर आपण जीवनात काहीतरी करू शकतो हे मुळात आपण समजून घ्यायला हवं. आज समाजात याची जागृती करण्याची आवश्यकता आहे. आजची युवा पिढी ध्येयहीन होत चालली आहे. पैसा हे सर्वस्व वाटू लागले आहे. पैसा झटपट मिळवण्याची ओढ आहे. पण पैसे हेच सर्वस्व नाही, हे देखील त्यांच्या मनावर बिंबवायला हवे.

मेहनतीने कमावलेले धन नेहमीच टिकते, तर अयोग्य मार्गाने मिळवलेले धन हे आपल्या घातासाठीच कारणीभूत होते हे सुद्धा इथे समजून सांगणे गरजेचे आहे. पालकांनी जागरूक राहणे तसेच सरकारने देखील याच्या विरोधात कठोर कायदा करण्याची आवश्यकता आहे.

भारतात केवळ आसाम, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये ऑनलाइन जुगाराच्या विरोधात कायदे आहेत. नुकतेच हिंदु जनजागृती समिती आणि समविचारी संघटनांनी गोवा आणि छत्तीसगड राज्यात मुख्यमंत्र्यांना या विषयी निवेदन दिले आहे.

दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने स्वतःच पुढाकार घेऊन या विषयी कठोर कायदे आणि कारवाई केल्यास राज्याची या सापळ्यातून लवकरच सुटका होईल. केवळ राज्यातच नाही तर आता केंद्र सरकारने पुढाकार घेऊन देशव्यापी कायदा करण्यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

■ अ‍ॅड. सौ. वैशाली महेश परांजपे

---

## कलार- कलाल समाजाच्या आर्थिक विकास महामंडळाचे काय?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता महायुती सरकारने अनेक महामंडळे वाटपाचे जवळपास ठरविल्याचे दिसून येते. या अगोदर समाजाच्या विकासासाठी अनेक आर्थिक विकास महामंडळे सरकारने जाहीर केलेत. सोबतच पावसाळी अधिवेशनात काही आमदारांनी इतरही समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे यासाठी आवाज सुध्दा उचलला.

परंतु गेल्या चार वर्षांपासून कलार-कलाल समाज भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाची मागणी करीत आहे.त्याकडे सरकार व आमदार हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की कलार-कलाल समाजाला आर्थिक विकास महामंडळ केव्हा देणार? आणि समाजाचा विकास केव्हा होणार? सरकारने दिलेल्या आश्वासनाचे काय? असे अनेक प्रश्न समाजापुढे उपस्थित होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता. निवडणुकांच्या आधी अनेक नियुक्त्या होण्याची दाट शक्यता आहे. राज्यामध्ये तब्बल १७० महामंडळे, प्राधिकरणे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी त्यावरील नियुक्त्या व्हाव्यात असा आग्रह महायुतीतील घटक पक्ष व भाजपाचा आहे याचे स्वागतच.

ही महामंडळे पक्षातील नेत्यांना खुश करण्यासाठी दिले जातात. यातही मलाईदार महामंडळे आपल्या पक्षाकडे असावे अशी प्रत्येक पक्षाची चढाओढ सुरू आहे. ह्या संपूर्ण बाबी राजकीय दृष्ट्या किंवा नेत्यांच्या दृष्टीकोनातून योग्य आहे. परंतु कलार-कलाल समाज विकासाच्या प्रवाहात यावा या उद्देशाने गेल्या चार वर्षांपासून समाजबांधव लढा देत असुन भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी करीत आहे.

परंतु सरकार याकडे नेहमीप्रमाणे आताही दुर्लक्ष करतांना दिसते ही अत्यंत दुःखद बाब आहे.आपणाला कल्पना असेल की बऱ्याचशा समाजाच्या आमदारांनी आपापल्या समाजाच्या विकासाच्या प्रती तत्परता दाखवुन सरकारकडून आर्थिक विकास महामंडळ खेचून आणले याचे स्वागतच. परंतु आता शंका निर्माण होत आहे की या सरकारमध्ये कलार-कलाल समाजाला न्याय देणारा आमदार किंवा मंत्री नाही का?

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महामंडळाचे वाटत व नियुक्त्या मोठ्या प्रमाणात होण्याची दाट शक्यता आहे हे आपण अवश्य करा याला समाजाचा विरोध नाहीच. परंतु कलार-कलाल समाजातील मागास समाजबांधवांसाठी सरकारने ताबडतोब आर्थिक विकास स्थापन करण्याची घोषणा करावी जेणेकरून समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजबांधवांना त्याचा लाभ घेता येईल.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

त्यामुळे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी स्वतः तत्परता दाखवुन कलार-कलाल समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी आग्रहाची विनंती आहे.

■ ■

---

# दह्यात मिसळून खा काही पदार्थ व्हिटॅमिन बी १२ झपाट्याने वाढेल



आजकाल अनेक लोकांमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दिसून येत आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात थकवा, चक्कर येणे, स्मरणशक्ती कमकुवत होणे आणि वारंवार डोकेदुखी यासारख्या समस्या सामान्य झाल्या आहेत.

मग त्यासाठी महागडे सप्लिमेंट्स, औषधे घ्यावी लागतात. पण आपण आपल्या रोजच्या आहारात काही पदार्थांचा समावेश केला तर नक्कीच आपल्या शरीरातील बी १२ वाढेल आणि कदाचित औषधांचीही गरज पडणार नाही. रोजच्या आहारात समाविष्ट करून घ्यायचा पदार्थ म्हणजे दही. फक्त दहीच नाही तर त्यात २ गोष्टी मिसळायच्या आणि त्या दह्याचं सेवन करायचं नक्कीच तुम्हाला फरक दिसून येईल. दररोज दह्यात दोन खास गोष्टी मिसळून ते खाल्ल्याने तुम्ही नैसर्गिकरित्या ही कमतरता दूर करू शकता.

**दही हे व्हिटॅमिन बी १२ वाढवण्यासाठी एक नैसर्गिक सुपरफूड**

दही स्वतःच एक आरोग्यदायी प्रोबायोटिक आहे जे पचन सुधारते आणि शरीराला थंड करते. त्यात आधीच काही प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ असते. परंतु जेव्हा त्यात काही गोष्टी मिसळल्या जातात तेव्हा ते व्हिटॅमिन बी १२ चे पॉवरहाऊस बनते.

**भाजलेले तीळ** : तीळ, विशेषतः पांढरे तीळ, व्हिटॅमिन-बी कॉम्प्लेक्सने समृद्ध असतात. त्यात निरोगी चरबी फॅट्स, खनिजे असतात जी दह्यासोबत मिसळल्यास व्हिटॅमिन बी १२ अजून वाढते. ते पचन सुधारते आणि शरीराला ऊर्जा देखील देते. एक चमचा भाजलेले तीळ दह्यात मिसळा आणि नाश्त्यात किंवा दुपारच्या जेवणात हे दही घ्या.

**मेथीचे दाणे** : मेथीच्या बियांमध्ये लोह, फायबर आणि व्हिटॅमिन बी भरपूर प्रमाणात असते. ते शरीरात पचन सुधारून पोषक तत्वांचे शोषण करण्यास मदत करते. दह्यासोबत मिसळल्याने ते व्हिटॅमिन बी १२ ची पातळी वेगाने वाढवते. मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. सकाळी ते गाळून घ्या आणि मग दह्यात मिसळा.

**याचे फायदे काय?**

थकवा आणि अशक्तपणा कमी होतो. स्मरणशक्ती आणि लक्ष केंद्रित करणे सुधारते, डोकेदुखी आणि चिडचिडेपणापासून आराम मिळतो, त्वचा आणि केसांचे आरोग्य चांगले राहते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

**दही खाताना या गोष्टींची काळजी घ्या**

नेहमी ताजे आणि साखर न घालता दही खा. कमीत कमी २१ दिवस नियमितपणे हा उपाय करा जर लक्षणे गंभीर असतील तर घरगुती उपायांसाबोत डॉक्टरांचा सल्लाही आवर्जून घ्या.


तर अशापद्धतीने व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर करण्यासाठी भाजलेले तीळ आणि मेथीचे दाणे दह्यात मिसळून खाऊन तुम्ही ही कमतरता नैसर्गिकरित्या दूर करू शकता. ही पद्धत केवळ सोपीच नाही तर चविष्ट देखील आहे.

■ ■ ■

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### आवाज कुणाचा ?

आवाज आहे -
सत्तालोलुपांचा
आवाज आहे -
स्वार्थी नेत्यांचा

आवाज आहे -
आया गयारामांचा
आवाज आहे -
दिशाहीन नेतृत्वाचा

आक्रोश आहे -
भ्रमनिरास झालेल्या
जनतेचा ...!!

# खरपी ते बेलोरा मार्ग बनला हिरवेगार झाडांचा कत्तलखाना



रस्ता गुळगुळीत, सावली मात्र शुन्य ?

*बादल डकरे*
*चांदुर बाजार, ( दि.2 )- खरपी ते बेलोरा मार्ग विस्तारिकरण व काँक्रीटीकरण काम युध्दस्तरावर सुरू आहे. मात्र या मार्गाच्या विस्तारीकरणासाठी मोठमोठ्या झाडाची कत्तल केली जात आहे. तसेच अनेक झाडांची अजून कत्तल होणार आहे, त्यामूळे या प्रकाराचा वृक्ष प्रेमींमध्ये मोठ्याप्रमाणात रोष पहायला मिळत आहे.*







कोरोना सारख्या परिस्थितीत ऑक्सिजनचे महत्त्व जगाने अनुभवले. ज्यापासून ऑक्सिजन निर्मिती होते अशी हिरवीगार झाडे, करजगाव ते खरपी दरम्यान सुरू असलेल्या मार्गावर बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात तोडण्यात आली आहेत. मात्र, तोडलेली झाडे ट्रान्सपोर्ट करून इतरत्र लावण्यात आली का, हा प्रश्न नागरिकांसह पर्यावरणप्रेमी उपस्थित करत आहेत. एकदा तोडलेले झाड पुन्हा तयार होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागतो. अशा स्थितीत विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल करणे कितपत योग्य आहे, असा सवाल होत आहे.

### परवानगी घेतली का ?

ज्या कंपनीला या रस्त्याचे बांधकाम करण्याचा करार देण्यात आला आहे, या कंपनीने झाडे तोडण्यासाठी रीतसर परवानगी घेतली का ?, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात परतवाडा वनपरिक्षेत्र अधिकारी दिनेश वाळके यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### तोडलेल्या झाडांचे पुढे काय ?

रस्त्याच्या कामासाठी तोडलेली झाडे नेमकी कोठे गेली ?, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. अधिकारी व कंत्राटदार कंपनी माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याने जनतेला अंधारात ठेवून हे विकास काम होत असल्याची चर्चा सुरू आहे. पर्यावरणप्रेमींचे मत आहे की, तोडलेल्या झाडांची पुनर्लागवड न केल्यास परिसरातील पर्यावरणीय संतुलन धोक्यात येईल.

### उभ्या झाडांवर नंबरींग

करजगाव ते खरपी मार्गावर अजून काही उभी असलेली मोठी झाडे नंबरींगसह दिसून येत आहेत. या झाडांचीदेखील कत्तल होणार का ? असा प्रश्न स्थानिक नागरिकांना पडत आहे. पर्यावरणप्रेमींची मागणी आहे की, झाडांची तोड थांबवून त्यांचे ट्रान्सप्लांटेशन करण्यात यावे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नवीन झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी प्रशासन व कंत्राटदार कंपनीने घ्यावी.



# शेतातील विद्युत प्रवाहाने घेतले तिघांचे बळी



## बैलजोडींसह शेतकऱ्याचा जागीच मृत्यू



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि. 2 )-** शेती करताना लागणाऱ्या विविध संकटांपैकी एक संकट आज जीवघेणं ठरलं. बेसखेडा येथील शेतकरी श्रीराम बळीराम घोरसे (वय अंदाजे 55) हे आज सकाळी आपल्या शेतात डवरणी कामात व्यस्त असताना एक दुर्दैवी घटना घडली. शेतात गेल्या काही दिवसांपासून झुकलेली विद्युत वाहिनी (लाईन) त्यांच्या संपर्कात आली. त्या लाईनमध्ये विद्युत प्रवाह सुरु असल्याने श्रीराम घोरसे यांना आणि त्यांच्या बैलजोडीस तात्काळ जबरदस्त शॉक बसला आणि तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ही घटना आज सकाळी सुमारे 11 वाजताच्या सुमारास घडली. श्रीराम घोरसे हे सकाळपासून त्यांच्या शेतात डवरणी करत होते. शेतात असलेली विद्युत वाहिनी जमिनीकडे झुकलेली होती व तीच त्यांच्या संपर्कात आली. त्यामुळे बैलजोडी आणि त्यांच्यासह स्वत: श्रीराम यांचा शॉकने जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती गावकऱ्यांनी पोलिस आणि महावितरण कार्यालयास कळवताच तत्काळ घटनास्थळी पोलीस दाखल झाले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वरूड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

ही घटना अत्यंत वेदनादायक असून, यामधून शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अनेक वेळा विद्युत विभागाच्या हलगर्जीपणामुळे असे अपघात घडत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. वेळेवर दुरुस्ती न केल्यामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

**शेतकऱ्यांच्या मागण्या**

महावितरण विभागाच्या निष्काळजीपणाची चौकशी करण्यात यावी. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला त्वरित आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी. शेतातील विद्युत तारांचे त्वरित दुरुस्ती व देखभाल करावी. ही घटना एक इशारा आहे की शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी योग्य उपाययोजना तात्काळ करण्यात याव्यात. अन्यथा अशी जीवघेणी उदाहरणे पुन्हा पाहावी लागू शकतात.

# चांदूर बाजार महसूल विभागाची अवैध वाळू तस्करी वर कारवाई

## अवैध वाळू तस्करी फोफावली

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.2 )-** तालुक्यातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात अवैध वाळू तस्करी व उत्खनन सुरू असून, या प्रकरणात काही कोतवालांच्या नातेवाईकांचाही सहभाग असल्याची चर्चा आहे. त्यांना राजकीय आश्रय असल्याने कारवाई टाळली जात असल्याचे चित्र आहे. मात्र महसूल दिनाच्या औचित्याने तहसीलदार कार्यालयाने अवैध वाळू तस्करीविरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे.

महसूल सप्ताहाच्या सुरुवातीलाच दोन मोठ्या कारवाया करण्यात आल्या. 1 ऑगस्ट रोजी सकाळी 7.40 वाजता मौजे पिंपरी तळेगाव येथे अवैध वाळू वाहतूक करताना ट्रॅक्टर (क्र. एमएच 27 /एल 5692) जप्त करण्यात आला. त्यानंतर 2 ऑगस्ट रोजी सकाळी 6.45 वाजता मौजे थुगाव येथे करजगाव मंडळाच्या हद्दीत आणखी एक ट्रॅक्टर अवैध वाळूसह पकडण्यात आला.




### महसूल सप्ताहात धडक मोहीम

1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह साजरा होत आहे. या कालावधीत अवैध वाळू तसेच मुरूम वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महसूल विभागाने राजकीय दबावाला बळी न पडता लोकाभिमुखतेने काम करावे, असा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

### प्रशासनाची जबाबदारी वाढली

काही दिवसांपूर्वी तालुक्यातील राजना पूर्णा येथे वाळू तस्करांनी एका युवकाला मारहाण केल्याची घटना ताजी आहे. त्यामुळे वाळू तस्करीच्या नादात आणखी गंभीर घटना घडू नयेत, यासाठी प्रशासनाने सतर्क राहण्याची गरज आहे. स्थानिक नागरिकांनी महसूल विभागाने अशा धडक कारवाया सातत्याने सुरू ठेवाव्यात, अशी मागणी केली आहे.

ही कारवाई उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव आणि प्रभारी तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये मंडळ अधिकारी कविता नागले, ग्राम महसूल अधिकारी राहुल जोशी, मनिष खलोकार, संजय चौधरीयांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच मंडळ अधिकारी परवीन काजी (अली), ग्राम महसूल अधिकारी निवृत्ती घुलक्षे, प्रफुल्ल डवरे, मेघाली अढाऊ, विश्वजित बंगरे, सचिन वानखडे यांचाही सहभाग होता.

# मालमत्ता कर वसुली शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## पहिल्याच दिवशी 1.60 कोटींची विक्रमी वसुली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )-** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने 2 व 3 ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या मालमत्ता कर वसुली शिबिरांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभला असून, आज शिबिराच्या पहिल्याच दिवशी संपूर्ण शहरातून तब्बल 1.60 कोटींची विक्रमी रक्कम वसूल करण्यात आली.




करदात्यांनी मोठ्या संख्येने शिबिरांना भेट देत सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत आपले कर भरणे प्राधान्याने पार पाडले. झोननिहाय वसुली पुढीलप्रमाणे झाली आहे. महापालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात 10 टक्के सवलत, ऑनलाईन पेमेंटवर अतिरिक्त 3 टक्के सवलत, तसेच पारदर्शक आणि सुलभ सेवा यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शहरातील विविध ठिकाणी माहिती कक्ष, हेल्पडेस्क आणि कर वसुली लिपिकांची प्रभावी व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांनी ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतींचा उपयोग करत महापालिकेच्या या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

शिबिरांना भेट देण्यासाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, योगेश पिठे,सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, नितीन बोबडे, धनंजय शिंदे, तसेच क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी शिबिरांच्या आयोजनाची पाहणी करत नागरिकांशी थेट संवाद साधून अभिप्राय नोंदवले.

### झोननिहाय झालेली वसुली

झोन 1 – 37.26 लाख
झोन 2 – 60.19 लाख
झोन 3 – 31.91 लाख
झोन 4 –21.93 लाख
झोन 5 –8.45 लाख

उद्या रविवार, 3 ऑगस्ट 2025 रोजी शिबिराचा दुसरा आणि अंतिम दिवस आहे. ज्यांनी अद्याप कर भरलेला नाही त्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा

**सौम्या शर्मा ( चांडक ),**
**आयुक्त महानगर पालिका,**
**अमरावती**

# उपअधीक्षक व सर्व्हेअरला पोलिस कोठडी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )** – भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक अनिल पांडुरंग नेमाडे व शहर सर्व्हेअर चंद्रशेखर पुंडलिक गोळे यांना 50 हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने 31 जुलै रोजी रंगेहाथ अटक केली. त्यांच्यावर गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, 1 ऑगस्ट रोजी दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मुलाच्या नावावर घर बदलून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी 1.25 लाखांची लाच मागितली होती. तडजोडीनंतर रक्कम 50 हजार रुपयांवर आली. तक्रारदाराने याबाबत अमरावती एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर सापळा रचण्यात आला. कोठडी सुनावतानाच्या सुनावणीत तपास अधिकाऱ्यांनी आरोपींचा नैसर्गिक आवाज नमुना घेण्याची गरज असल्याचे न्यायालयाला सांगितले. तसेच लाच रकमेचा वापर बेनामी मालमत्तेत किंवा बँकेत गहाण ठेवण्यात झाला आहे का, याचीही चौकशी गरजेची असल्याचे नमूद करण्यात आले. परिणामी न्यायालयाने दोन्ही आरोपींना पोलिस कोठडी सुनावली. दरम्यान, एसीबीने दोघांच्या घरांची झडतीही घेतली.

# अवैध दारूविक्रीविरोधात शिरजगावच्या महिला आक्रमक !

## शेकडो महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 ) –** 'आमच्या मुलांचे भवितव्य वाचवा, आमचे संसार वाचवा!' या घोषणांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दुमदुमला. चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगाव कोरडे येथील शेकडो महिलांनी गावात वाढत्या अवैध दारूविक्रीविरोधात मोठा मोर्चा काढत प्रशासनाला इशारा दिला.

गावात मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या देशी दारू विक्रीमुळे तरुणाई व्यसनाधीन होत असून, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. महिलांनी सांगितले की दारूच्या या सावटामुळे गावातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन धोक्यात आले आहे. व्यसनाधीनतेमुळे काहींचे प्राणही गेले आहेत. या पार्श्वभूमीवर गावातील महिला सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांसह शेकडो महिलांनी प्रशासनाविरुद्ध आक्रोश व्यक्त केला. महिलांनी इशारा दिला की कारवाई न झाल्यास त्या उपोषणास बसतील आणि आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीवर बहिष्कार टाकतील. ग्रामसभेत 25 जुलै रोजीच अवैध दारूविक्री बंद करण्याचा ठराव संमत झाला होता. मात्र त्याची अंमलबजावणी न झाल्याने महिलांनी थेट जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. त्यांनी प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.




अवैध दारूविक्रीमुळे गावातील वातावरण खराब होत आहे. तरुणाईचे भविष्य धोक्यात आले आहे. कारवाई न झाल्यास आम्ही उपोषणास बसू व निवडणुकीवर बहिष्कार टाकू.

**संगीता बद्रे,**
**उपसरपंच, शिरजगाव ( कोरडे )**

### दारुसोबत चकणाही बंद करा!

महिलांनी केवळ दारूविक्रीवरच नाही, तर त्यास हातभार लावणाऱ्या भजीये, फरसाण अश्या चकण्याच्या आणि इतर दुकानांवरही बंदी घालण्याची मागणी केली. आंदोलनाचे नेतृत्व सरपंच सीमा बनसोड, उपसरपंच संगीता बद्रे, रूपाली नसोड, वैशाली बनसोड, लता ढोरे, रंजना कंगाले, आशा घोडेस्वार, दुर्गा चचाणे, कोकिळा तावडे, चंदा राऊत, रेश्मा बंडारी आणि रुक्मा नेवारे यांनी केले.

# डवरादेव फाटा ते राहु रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य



मार्गाची दुर्दशा, नागरिकांची डोकेदुखी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.2 ) –** डवरादेव फाटा ते राहु या दरम्यानचा प्रमुख रस्ता सध्या खड्डेमय झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. ठिकठिकाणी रस्ता उखडल्याने तो ओळखूही येत नाही. रस्ता आहे की मातीचा ढीग, हेच समजत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी केवळ लाल मुरुम व लहान बोल्डर टाकण्यात आले आहे, मात्र पावसाळ्यात पाणी साचल्याने हे मुरुम वाहून जाते आणि रस्ता आणखी धोकादायक बनतो. वाहनचालकांना या मार्गावर आपली वाहने चालविताना मोठी डोकेदुखी सहन करावी लागत आहे. सोबतच या मार्गावर अपघात होण्याची शक्यताही मोठ्याप्रमाणात वाढली आहे. या रस्त्याचा वापर हतरु, भांडुम व आजूबाजूच्या गावातील नागरिक करतात. इतक्या महत्त्वाच्या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिकांत आहे. रस्त्याचे डांबरीकरण पूर्णपणे उखडल्याने कायमस्वरूपी दुरुस्तीची मागणी सातत्याने होत आहे.

### अन्यथा आंदोलन छेडू!

पावसाळ्यात ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था बिकट होते, परंतु प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, अपघात टाळण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक झाले आहे. नागरिकांनी इशारा दिला आहे की, लवकरच हा रस्ता दुरुस्त न केल्यास मोठे आंदोलन छेडले जाईल. प्रशासनाने तातडीने पावले उचलून डवरादेव फाटा ते राहु मार्गाचे कायमस्वरूपी डांबरीकरण करावे, अशी मागणी जोर धरत आहे.







ललित

**श्रावण... एक मनभावन मास.**
**या महिन्यात सृष्टीकर्त्याचा कुंचला असा काही फिरतो की सृष्टीच्या कॅनव्हासवर रंगपटातील जवळपास प्रत्येक रंग उतरतो. म्हणून या दिवसात केवळ मोराचाच नव्हे तर आपल्याला मनाचा पिसाराही फुलतो. पण असा नितांतसुंदर श्रावण अनुभवायचा तो शांत मनानं. याला पाहण्यासाठी कॅमेऱ्याच्या नव्हे तर डोळ्यांच्या लेन्स पॉवरफूल हव्या. तरच तो मनात झिरपेल आणि सर्जनाचे मळे फुलवेल...**

घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा... आताही असंच एक धारानृत्य रंगलं आहे. नभ उतरु आलं आहे. दरवाजा थोडा किलकिला करुन बाहेर नजर टाकली तरी जलभारानं काठोकाठ भरलेल्या त्या गर्द नभांची दाटी नजरेत भरते. ते थंडगार शिडकावे आत येऊ पाहतात. वाऱ्यावर स्वार झालेल्या त्या सरी जागोजागी साठलेल्या पाणतळ्यांवर झाडाझुडुपांवर, कौलांवर, तारांवर असा काही ताल धरताना की माणसांनीच काय वृक्षलतांनीही तन्मय होऊन डोलावं. वातावरणातील रम्यतेमुळे, नव–तेजामुळे शेतशिवारं फुलल्यामुळे श्रावणमासाला वेगळं मांगल्य लाभलं आहे. चराचराबरोबर मनाचा पसाराही फुलत असल्यामुळेच हा महिना आपल्याला समाधानाच्या परमोच्च पातळीवर घेऊन जातो. निसर्गाचं लुभावणारं रुप श्रमलेल्या तनामनाला नवी उमेद देतं. तृणपात्यांप्रमाणेच मनालाही अंकुर फुटतात. संपन्नतेची स्वप्न वेगळी उभारी देऊन जातात. काम करण्याची प्रेरणा मिळतेच त्याचबरोबर अशा रम्य वातावरणात श्रद्धाभावही जागृत होतो. अशा या सश्रद्ध अवस्थेत आपल्याला उपयुक्त ठरणाऱ्या, मदतीस येणाऱ्या, सोबत करणाऱ्या प्रत्येकाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच श्रावणाचा रंग अधिक गहिरा भासतो.

श्रावण म्हणजे उत्सवांचा सळसळता उत्साह घेऊन येणारा महिना. यातील प्रत्येकच दिवस एक सण असतो. श्रावण सोमवारी शिवामूठ वहायची, मंगळवारी मंगळागौरीचं पूजन करायचं, बुधवारी बुधाची पूजा, गुरुवारी बृहस्पतीची आराधना, शुक्रवारी जिवतीची पूजा, शनिवारी शनीला वंदन करुन मुंज्याला जेवायला घालण्याचे सोपस्कार आणि रविवारी आदित्याची उपासना करुन तेजापुढे नतमस्तक व्हायचं. अशा सात दिवसांच्या सप्तचक्राच्या जोडीला असते श्लोक–आरत्यांची रुणझुण, कहाण्यांच्या कानगोष्टी आणि मनमोकळं खेळण्याच्या नाचरा अविष्कार... या सर्व माध्यमातून गृहिणीला धबगड्यातून बाहेर डोकावण्याची संधी देणारा श्रावण तिचा जिवलग सखा कधी होऊन गेला हे तिलाही कळलं नसेल. नागपंचमीला साळकाया–माळकाया जमवून गाणी म्हणत नागाची पूजा करायची, मंगळागौरीला सकाळी पूजा झाल्यावर सायंकाळी मैत्रिणीसंगे मनसोक्त खेळायचं, झाडांवर बांधलेल्या झोक्यांवर स्वार होत आकाशाला गवसणी घालायची, माहेरी परतलेल्या सख्या–सोबत्यांसवे गुजगोष्टी करत कोडकौतुक झेलत आनंदात चार क्षण घालवायचे आणि तनमनात उत्साहाचे झरे खेळवत आपापल्या संसाराचे मळे फुलवण्यासाठी घराकडे परतायचे अशी सहज स्वाभाविक पद्धत होती पूर्वी श्रावण साजरा करण्याची. अगदी वाडासंस्कृती लयास जाऊन चाळसंस्कृती आली तेव्हादेखील श्रावण असाच मोकळेपणाने सामोरा यायचा आणि खणा–दोन खणांची खोली भरवून टाकायचा. मग कोठेतरी कोपऱ्यात मंगळागौरीची पूजा सजायची. सत्यनारायणाची पूजा व्हायची. खालच्या मोकळ्या जागेत खेळ रंगायचे. जागेची ऐसपैस कमी झाली तरी विचारांचा पैस आक्रसला नव्हता तेव्हापर्यंत सर्वांना श्रावण असाच भेटायचा.

लहानग्या कुमारिका, युवती सवाष्णींची नवीन बांगड्या भरण्याची लगबग, हातावर मेंदीचे पाच गोळे काढून ते लालचुटूक रंगल्यावर निरखण्यातली नवलाई, कधी नव्हे ते नखांवर चढणारे रंग, केसात माळलेले नाजूक जुईचे गजरे, सर्वांचंच अप्रूप... दुसरीकडे प्रौढा घरातील व्रतवैकल्य, उपासतापासाच्या तयारीत. सत्यनारायणाची पूजा ठरवायची, नारळी पौर्णिमेची तयारी करायची, राखी पौर्णिमेला भावाला जेवायला बोलवायचं, येऊ घातलेल्या गणपती–गौरीच्या आगमनासाठी सज्ज रहायचं अशी एक ना अनेक व्यवधानं त्यांच्या मागे. या सर्वात वृद्धांना पर्वणी ती कथा कीर्तनाची, प्रव–चनाची... जवळ रामाच्या अथवा विठ्ठलाच्या मंदिरात दररोज सायंकाळी कोण्या बुवांच्या तोंडून रसभरित आख्यान ऐकायचं, भजनात रममाण व्हायचं, पैलतीरी पोहोचताना उपयोगी पडतील अशा चार समजुतीच्या गोष्टी ऐकायच्या आणि एकभुक्त अथवा एकनुक्ताचं पथ्य पाळत कांदा–लसणाचं अन्न वर्ज्य करत ईश्वरभक्तीत तल्लीन व्हायचं... श्रावणाचा अर्थ प्रत्येक वयोगटासाठी असा वेगळा होता म्हणूनच तो आगळा होता. तो मनाला भिडायचा म्हणूनच सासरच्या जाचात अडकलेली कोणी सासुरव–ाशीण माहेरच्या आठवणीने विव्हळ व्हायची. अब के बरस भेजो भैया को बाबूल... अशी आर्त हाक घालायची. कोणी क्षितीजी आले भरते गं... म्हणत या मनोहारी मासाचं वर्णन करायचे. श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे... ची अनुभूती प्रत्येकाला आपली वाटायची. घर आजा घिर आई बदरा सावरिया... म्हणून कोणी प्रेयसी प्रियकराला साद साद घालायची.

आताही श्रावण असाच येतो. अगदी त्याच दिमाखात. आताही भिंती शेवाळतात, जलसाठी तुडूंब भरतात. चार दिवस का होईना नद्या दुथडी भरुन वाहतात. काँक्रिटच्या कडेने अंग चोरून तग धरलेल्या मातीवर गवताचे पिटुकले मळे फुलतात. रहदारीचा कर्कश्श आवाजातही पेरते व्हा... चा संदेश देणाऱ्या पावशाचा स्वर घुमतो. वर्षभराची धूळ वाहून गेल्यामुळे झाडं नवतेजाने चकाकू लागतात. श्रावण पूर्वी येतो तसाच येतो पण आता त्याच्याकडे पहायला कोणालाही वेळ नाही. त्यामुळे पूर्वीस–ारखा तो कितीजणांच्या मनाला भिडतो हे कळत नाही. कारण या मनभावन श्रावणाच्या सानिध्याने सुखावलेल्या नद्यांवर थोडं बाळसं चढलं तरी काळजी लागते पात्रालगतच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याची. इकडे मल्हार रंगत असताना टीव्हीवर बातम्या झळकतात अनधिकृतरित्या नदी पात्रावर आक्रमण करुन वसवलेल्या वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याच्या, त्यांचे संसार जलमय झाल्याच्या. जरा कुठे धबधबे पाणावू लागले, प्रवाह वाहते होऊ लागले की अधाशासारखी माणसं गर्दी करतात आणि कोणी अपघातग्रस्त झाले की वाहिन्यांना ती ब्रेकिंग न्यूज मिळते. गडकिल्यांवर, कड्याच्या टोकांवर रासक्रिडा करण्यात दंग असणारे तोल जाऊन पडतात आणि त्या बातम्या बहरलेल्या हिरवळीला आच्छादून टाकतात. निसर्ग बघायला आता बहुतेकांना कॅमेऱ्याची लेन्स लागते. इतकं सौंदर्य पाहण्याची, टिपण्याची आणि साठवण्याची डोळ्यातील स्पेस कदाचित कमी झालेली असावी. म्हणूनच स्मार्ट फोनच्या मेमरी कार्डामध्ये बसतील तितके फोटोंचे तुकडे कोंबायचे आणि एंजॉय करायचं. पण ५.५ इंचाच्या स्क्रीनमधून किती दिसणार आणि काय दिसणार? शिवाय यातही लोकांना या बहराची केवळ पाश्वभूमी हवी असते. सगळं लक्ष सेल्फीतल्या स्वतःच्या रुपड्यावर!!! या मानसिकतेने अथांग हिरवाईकडे पाहू जाल तर कसा भेटेल श्रावण कोणाला? तो तर एक किमयागार आहे. अवलिया चित्रकार आहे. हिरव्या रंगातील कदाचित एकही छटा अशी नसेल जी या चित्रकर्त्याने सृष्टीच्या पटलावर उमटवली नसेल. ती बघण्यासाठी कॅमेऱ्याच्या नव्हे तर डोळ्यांची लेन्स पॉवरफूल हवी. ती साठवण्यासाठी मनाच्या मेमरीकार्डामध्ये स्पेस हवी. हे रेखाचित्र मनात उमटलं तर कुठूनही कधीही डिलीट होण्याचा धोका नाही. शेवटी हा सृजनाचा सोहळा आहे. तो एक अनुभव आहे. देखणी अनुभूती आहे, निसर्गशक्तीचा उत्कट अविष्कार आहे. त्याच्यापाशी जायचं तर बाहेरचा कोलाहल थांबायला हवा. अंतरीची कवाडं उघडायला हवी. अशी साधकाची अवस्था असेल तरच निसर्गाची भाषा कळेल. प्रपातांची भव्यता तनालाच नव्हे तर मनालाही ओलेचिंब करुन टाकेल. शरीर काय शॉवरच्या पाण्याखालीही भिजतं, पण उंचकड्यावरुन प्रपात कोसळतो तेव्हा तो मनातील दगडगोटेही बरोबर घेऊन जातो. गरज आहे त्याला तितक्याच राजसपणे भेटण्याची. दारुच्या बाटल्या रिचवून मोठ्या आवाजात गाणी लावून, किंचाळून उन्माद व्यक्त करणाऱ्यांना हा श्रावण कधीच भेटणार नाही. श्रावणाला सामोरं जाताना हा उत्सव जगण्याची आस धरु या. घरी सत्यनारायणाची पूजा जरुर करु पण प्रसाद प्लॅस्टिकच्या पिशव्यातून घरोघरी न वाटता तो हाताच्या द्रोणात देण्यासाठी माणसांना घरी बोलवू. मंगळागौरीसाठी मोठा हॉल घेणं शक्य नसेल तरी हरकत नाही पण पैसे देऊन मंगळागौरीचे खेळ खेळणाऱ्या बायकांचा गट बोलावण्यापेक्षा आपणच झिम्मा–फुगडी घालू, मनसोक्त हसू, खिदळू... या हास्यरंगातच श्रावणाचे मळे खुलतील.

## शिवलिंगाला अर्धप्रदक्षिणा का घालावी?

जाणून घ्या

श्रावणमासाला आता सुरूवात झाली आहे. श्रावणात शंकराच्या आराधनेचं, पूजनाचं विशेष महत्त्व असतं.

महादेवाचं पूजन करताना काही नियमांचं पालन करावं लागतं. शंकाराच्या पूजनात वर्ज्य असणारी एक बाब म्हणजे पूर्णप्रदक्षिणा. शंकराला, त्यातही शंकराच्या पिंडीला कधीही पूर्ण प्रदक्षिणा घा–तली जात नाही. अर्ध्यातूनच मागे फिरावं लागतं.



शिवलिंगाची अर्धपरिक्रमा करण्यामागचं नेमकं कारण जाणून घेणं गरजेचं आहे. शिवपुराण आणि शास्त्रांमध्येही याबाबत नमूद करण्यात आलं आहे. शिव म्हणजे आदी आणि अंत असल्याने त्याला अर्धपरिक्रमा घालायला हवी, असं शास्त्र सांगतं.

* दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शिवलिंगाची रचना. शंकराच्या पिंडीतून बाहेर पडणारी ऊर्जा अमर्याद असते. शिवलिंगाचा निर्मिली हा भाग या ऊर्जेचं प्रतिनिधित्त्व करतो. पिंडीला अर्पण केलेलं दूध आणि पाणी शिवलिंगाच्या ज्या भागातून बाहेर पडतं तो भाग म्हणजे निर्मिली.

* शिवाच्या शक्तीचं स्वरूप अत्यंत तीव्र असल्याने त्या मध्ये येण्याची हिंमत कोणीही करू शकत नाही. निर्मिलीमध्ये ही शक्ती वास करत असल्याने शिवलिंगाचा हा भाग अत्यंत पवित्र मानला जातो. निर्मिली ओलांडून जाऊ नये, असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. गंधर्व नावाच्या शिवभक्त राजाने पूजनानंतर पूर्ण प्रदक्षिणा घालून निर्मिली ओलांडली. यानंतर या राजाची बुद्धी, शक्ती, संपत्ती नष्ट झाली.

* निर्मिलीला स्पर्श केल्याने तसंच ती ओलांडल्याने शिवलिंगाचा म्हणजे साक्षात भगवान शंकराचा अपमान होतो, असं मानलं जातं. शिवलिं–गाला अर्धप्रदक्षिणा घालण्याची प्रथा आहे.

* जुन्या काळात शिवलिं–गाची रचना विशिष्ट प्रकारे केली जात असे. निर्मिली जमिनीखाली राहिल या पद्धतीने शिवलिंग निर्माण केलं जात असे. पण आधुनिक युगात निर्मिली जमिनीच्या वरच्या भागातच असते. पूर्ण प्रदक्षिणा घातली तर ती ओलांडली जाते. त्यामुळे शिवलिंगाच्या पूजनानंतर अर्धप्रदक्षिणा घालणं योग्य ठरतं.

## जय देवी मंगळागौरी...

परंपरा

श्रावण सुरू झाला की वेध लागतात ते विविध व्रतवैकल्यांचे... यामुळे महिलावर्ग प्रचंड उत्साहात असतो. या महिन्यातलं एक पवित्र व्रत म्हणजे मंगळागौर. नवविवाहिता मंगळागौरीचं व्रत करतात. लग्नाच्या पहिल्या वर्षापासून पाच वर्षं मंगळागौरीच्या व्रताचा वसा घ्यायचा असतो. मंगळागौर म्हणजे शीव आणि शक्तीची पूजा. या व्रताचे धार्मिक संदर्भ आहेतच शिवाय जुन्या काळात महिलांची करमणूक किंवा त्यांनी एकत्र येण्याच्या दृष्टीने या परंपरेची, विशेषतः मंगळागौरीच्या खेळांची सुरूवात झाली असावी, असं मानलं जातं. मंगळागौरीनिमित्ताने चार महिला एकत्र येत, त्यांच्यात विचारांचं आदानप्रदान होत असे. एकमेकींची सुखदुःख वाटून घेतली जात असत. खेळांच्या निमित्ताने व्यायाम होत असे. जुन्या काळात लहान वयात लग्न होत असल्याने मुली नववारी साड्या नेसून हे खेळ खेळत असत.

काळ बदलला असला किंवा महिला कमावत्या झाल्या असल्या तरी मंगळागौरीची प्रथा आजही कायम आहे. अर्थात त्यात काळानुरूप बदल झाले आहेत. मुंबईसारख्या ठिकाणी तर लोकल ट्रेनमध्येही मंगळागौर पुजली जाते. आजच्या पिढीतल्या महिलांना मंगळागौरीचे खेळ फारसे ज्ञान नसल्याने हे खेळ खेळणारे समूह तयार झाले आ–हेत. महिलावर्ग व्यावसायिक पद्धतीने हे खेळ खेळतात. परंपरा जपण्यासोबतच अर्थार्जन करण्याचाही उद्देश यामागे असतो. नवविवाहितांना आजही मंगळागौरीचं आकर्षण वाटतं. श्रावणातल्या एखाद्या मंगळवारी मंगळागौर समारंभाचं आयोजन केलं जातं. घरं छोटी झाल्याने आणि घराला अंगण न राहिल्याने मंगळागौर सभागृहात करण्यावर अनेकांचा भर असतो. या निमित्ताने छोटा समारंभ केल्याचं आणि गाठीभेटी झाल्याचं समाधा–नही मिळतं. मंगळागौरीच्या निमित्ताने छान सजावट केली जाते. या सजावटीत महिलावर्ग हिरीरीने पुढाकार घेतो. मंगळागौरीचे खेळ रंगतात. लहान मुलींपासून ज्येष्ठ महिलांपर्यंत प्रत्येकजण या खेळांचा आनंद लुटतात. ज्येष्ठ महिला पुन्हा एकदा तारूण्यातल्या आठवणींमध्ये रमून जातात. नवविवाहितांनाही परंपरा जपल्याचं समाधान लाभतं.



मंगळागौरीच्या निमित्ताने सासर आणि माहेरची मंडळी एकत्र जमतात. आ–ळखी होतात. या निमित्ताने कौटुंबिक स्नेहम–ळावाच होऊन जातो. आजच्या मुली शिक्षित झाल्या असल्या, नोकरी व्यवसायाच्या चक्रात अडकल्या असल्या तरी अशा सोहळ्यांसाठी आवर्जुन वेळ काढतात. अशा प्रथांमागे दडलेला मायेचा ओलावा आधुनिक काळातही तितकाच हवाहवासा वाटतो. या निमित्त–ाने रोजच्या धकाधकीतून विरंगुळाही मिळतो. यामुळे नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी महिलावर्ग सज्ज होत असतो.

## या शिवलिंगाची वाढतेय उंची!

तीर्थक्षेत्र

भगवान शंकराची जगभरात अनेक मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं काही ना काही वैशिष्ट्य आहे. अशीच चार मंदिरं भारताच्या वेगवेगळ्या भागात आहेत. या मंदिरातल्या शिवलिंगांची उंची सातत्याने वाढते आहे. यामागच्या कारणांचा थांग विज्ञानालाही लागलेला नाही.

* बनारस ही भगवान शंकराची नगरी. याच ठिकाणी तिल भांडेश्वर मंदिर आहे. या मंदिरातलं शिवलिंग स्वयंभू असून सत्ययुगात अवतरल्याचं मानलं जातं. कलियुगाचा प्रारंभ होण्याआधी या शिवलिंगाचा आकार दररोज तीळातीळाने वाढत होता. आकार असाच वाढत राहिला तर एक दिवस ही पृथ्वीच शिवलिंगात सामावली जाईल, अशी भीती भक्तांना वाटू लागली. भक्तांनी शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाला. या लिंगाची उंची फक्त संक्रांतीला वाढेल, असा वर त्याने दिला. तेव्हापासून या शिवलिंगाची उंची संक्रांतीला वाढते, असं म्हणतात.

* हिमाचल प्रदेशात पौडावाला शिवमंदिर आहे. या शिवलिंगाची स्थापना रावणाने केली, असं मानलं जातं. दर महाशिवरात्रीला या शिवलिंगाची उंची ज्वारीच्या दाण्याइतकी वाढते, असं म्हणतात. मध्य प्रदेशमधल्या खजुराहोमध्ये मतंगेश्वर मंदिर आहे. या




मंदिरातलं शिवलिंग दर वर्षी तिळाइतकं वाढतं, असं म्हणतात.

* छत्तीसगडची राजधानी रायपूरपासून सुमारे ९० किलोमीटर अंतरावर नैसर्गिक शिवलिंग आहे. याला भूतेश्वर शिवलिंग असं म्हटलं जातं. हे शिवलिंग दर वर्षी सहा ते आठ इंचांनी वाढतं, असं म्हटलं जातं.

## शिकवण नागपंचमीची

सण–उत्सव

पर्यावरणाचा तोल सांभाळून ठेवण्यापासून मनुष्याला उपयुक्त ठरण्यापर्यंत या पृथ्वीतलावरच्या पशूपक्ष्यांचे अनंत उपकार आपल्यावर आहेत. हिंदू धर्मातल्या प्रथा, परंपरा तसंच सण–उत्सवांच्या माध्यमातून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. नुकताच साजरा झालेला नागपंचमी हा सुद्धा असाच एक सण. श्रावण शुद्ध पंचमी हा दिवस नागपंचमीचा असतो. या दिवशी नागदेवतेची पूजा केली जाते. नाग किंवा साप हे शेतकऱ्यांचे मित्र मानले जातात. पर्यावरणाचा समतोल राखण्यातही त्यांची भूमिका महत्त्वाची असते. पण विषारी असल्याने नागांना मारून टाकलं जातं. लोकांना सापाची भीती वाटते. या पार्श्वभूमीवर नागपूजनाची परंपरा सुरू झाली असावी. यामागे नागदेवतेला प्रसन्न करून घेण्याची भावना असते. नागोबाला दूध, लाह्या अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली जाते. काही




वर्षांपूर्वीपर्यंत गारूडी नाग घेऊन दारोदारी हिंडत असत पण नागांवर होणारे अमानुष अत्याचार लक्षात घेऊन ही प्रथा बंद करण्यात आली. त्यामुळे आता नागाचं चित्र रेखाटून किंवा मूर्ती आणून पूजा केली जाते. रांगोळीनेही नाग साकारता येतो. पाटावर चंदनाने पाच फण्यांचा नाग काढला जातो. अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, तक्षक, कलिया, शंखापाल, कंषल आणि धृतराष्ट्र हे नवनाग मानले जातात. त्यांना स्मरण करून पूजा केली जाते. ग्रामीण भागात नागपंचमीचा उत्साह दांडगा असतो. तसंच शेतकऱ्यांमध्ये या सणाचं विशेष महत्त्व आहे. नागपंचमीच्या सणामागे अनेक पौराणिक कथा आहेत. प्रत्येक कथेचे वेगवेगळे संदर्भ आहेत. पण नागांप्रती कृतज्ञता व्यक्त करणं ही त्यामागची मुख्य भावना आहे. आजच्या काळात प्रतिक स्वरूपात नागाची पूजा करणं योग्य ठरतं. त्यातच नागांची फक्त पूजा न करता त्यांचं जतन करण्याचा आणि सापांची हत्या न करण्याचा वसा या दिवसानिमित्ताने घेतला पाहिजे. तरच नागपंचमीला खऱ्या अर्थाने नवा दृष्टीकोन मिळू शकेल.

## लक्षणं कुविद्येची

दासबोधातून...

समर्थ रामदासांनी दासबोधात विविध लक्षणं वर्णन केली आहेत. कुविद्येच्या लक्षणांविषयी समर्थ म्हणतात, ऐका कुविद्येची लक्षणें। अति हीनें कु–लक्षणें। त्यागार्थ बोलिली ते श्रवणें। त्याग घडे।।१।। ऐंका कुविद्येचा प्राणी। जन्मा येऊ न केली हानी। सांगिजेल येहीं लक्षणी। वोळखावा।।२।। कुविद्येचा प्राणी असे। तो कठिण निरूपणें त्रासे। अवगुणांची समृद्धी असें। म्हणौनिया।।३।। याचा अर्थ असा की कुविद्येची लक्षणं अत्यंत हीन आहेत. ही लक्षणं ऐकून त्यांचा त्याग करणं उत्तम. श्रोतेजनांनी या लक्षणांचा त्याग करावा, यासाठी त्यांचं वर्णन करून सांगत आहे. जन्माला येऊन स्वतःची हानी करून घेणारा कुविद्येचा प्राणी असतो. कुविद्येच्या लक्षणांवरून असा प्राणी ओळखणं शक्य होईल. कुविद्येची लक्षणं असलेला मनुष्य अवगुणांची खाण असतो. त्याच्या ठायी सगळे अवगुण असतात. या अवगुणांच्या निरूपणाने तो त्रासलेला असतो.




पुढच्या ओव्यांमध्ये समर्थ कुविद्येची अनंत लक्षणं वर्णन करून सांगतात. त्यातली काही लक्षणं पुढीलप्रमाणे आहेत– काम क्रोध, मद मत्सर लोभ दंभ तिरस्कार। गर्व ताठा अहंकार। द्वेष विषाद विकल्पी।।४।। आशा ममता तृष्णा कल्पना। चिंता अहंता कामना भावना। असूया अविद्या ईषणा वासना। अतृप्ती लोलंगता ।।५।। म्हणजे काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, दंभ, तिरस्कार, गर्व, ताठा, अहंकार, द्वेष विषाद, आशा, ममता, तृष्णा, कल्पना, चिंता अहंता, कामना, भावना, असूया, अविद्या, अतृप्ती, आसक्ती, इच्छा, वाच्छा.... अशी कुविद्येच्या लक्षणांची न संपणारी यादी आहे.

समर्थ पुढे म्हणतात, समयो नेणे, प्रसंग नेणे। प्रेत्न नेणे, अभ्यास नेणे। आर्जव नेणे। मैत्री नेणे। कांहीच नेणे अभागी ।।३८।। असो ऐसे नाना विकार। कुलक्षणांचे कोठार। ऐसा कुविद्येचा नर। श्रोतीं वोळखावा।।३९।। ऐसी कुविद्येची लक्षणें । ऐकोनि त्यागाचि करणें। अभिमाने तऱ्हे भरणें। हे विहित नव्हें ।।४०।। याचा अर्थ असा की, कुविद्येची लक्षणं असलेल्या मनुष्याला काहीही कळत नाही. त्याला वेळप्रसंगी कसे वागावे ते कळत नाही. प्रयत्न करणं जमत नाही. अभ्यास जमत नाही. आर्जवाने वागता येत नाही. कोणाशी मैत्री करता येत नाही. असा मनुष्य अभागीच म्हटला पाहिजे.

## जिवती पूजनाची परंपरा

प्रथा परंपरा

काळाच्या ओघात काही प्रथा बदलल्या आहेत तर काही विस्मृतीत गेल्या आहेत. श्रावण महिन्यातली अशीच एक परंपरा म्हणजे जिवतीची पूजा. जिवतीचा एक कागद मिळतो. या दिवसांमध्ये अनेक घरांमध्ये असा कागद लावलेला दिसून येतो. जुन्या पिढीतल्या स्त्रियांचा या परंपरा पाळण्यावर भर असतो. श्रावणातल्या प्रत्येक दिवसाचं महत्त्व आगळं आहे. त्यातही श्रावणातल्या शुक्रवारी काही घरांमध्ये लक्ष्मी आणि कुलदेवीची पूजा केली जाते. या निमित्ताने सुवासिनींना घरी बोलावून हळदी–कुंकू दिलं जातं. श्रावणातल्या चारही शुक्रवारी सुवासिनींना घरी बोलावून हळदी–कुंकू देऊन दूध–साखर, चणे फुटाणे देण्याची परंपरा आहे. श्रावणी शुक्रवारीच जिवतीची पूजा केली जाते. श्रावण महिन्याच्या सुरूवातीला येणाऱ्या मंगळवार, बुधवार, शुक्रवार किंवा शनिवार यापैकी एका दिवशी जिवतीचा कागद देव्हाऱ्याजवळ लावला जातो. संततीरक्षणासाठी जिवतीची पूजा केली जाते. आठवड्यातून चार वेळा जिवतीची पूजा केली जाते. त्यात शुक्रवार हा महत्त्वाचा वार मानला जातो. शुक्रवारी पुरणाच्या स्वयंपाकाचं महत्त्व असतं. जिवतीची पूजा करून तिचं औक्षण केलं जातं. त्यानंतर मुलांना पाटावर बसवून त्यांचं औक्षण केलं जातं. मुलांच्या कल्याणासाठी तसंच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी जिवतीमातेची आराधना केली जाते. मुलं परगावी असतील तर चारही दिशांना औक्षण करून अक्षता टाकल्या जातात. यामुळे पर–गावी असलेल्या मुलांचं औक्षण होतं असं मानलं जातं.



जिवतीपूजनाच्या निमित्ताने आई आणि मुलं यांच्यातलं भावनिक नातं अधिक चांगल्या प्रकारे फुलतं.

# बिबट्याने केली बिबट्याची शिकार

## आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयात थरार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांची सुरक्षा व्यवस्था पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या प्राणीसंग्रहालयात सातत्याने बाहेरील बिबट्यांचा शिरकाव वाढला आहे. या प्राणीसंग्रहालयातील बिबट्याच्या पिंजऱ्यात शिरुन राणी नावाच्या मादी बिबट्याचा बळी घेतला.

दोन वर्षापूर्वी ह्यचांदणीह्न नावाच्या मादी बिबट्याचा बळी घेतला होता. गोरेवाडा परिसरात मोठ्या संख्येत बिबट असून प्राणीसंग्रहालयाच्या स्थापनेपूर्वी अनेकांना या परिसरात बिबट्याचे दर्शन झाले आहे.

प्राणीसंग्रहालय तयार झाले तेव्हा प्राणी आणि पर्यटक यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने याठिकाणी सर्व व्यवस्था करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, गोरेवाडा व्यवस्थापनाचा हा दावा खोटा ठरला आहे. प्राणीसंग्रहालयाबाहेरील बिबट सातत्याने याठिकाणी प्रवेश करत आहेत. त्यामुळे येथील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्राणीसंग्रहालयाची धूरा सुरुवातीपासूनच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हातात देण्यात आली. त्यानंतर याच कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी करण्यात आले. मात्र, वन्यजीव व्यवस्थापनाचा कोणताही अनुभव नसल्यामुळे प्राणसंग्रहालयात सातत्याने अशा घटना घडत गेल्या.

या कंत्राटी कर्मचाऱ्याला प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांच्या पिजऱ्याचा साधा दरवाजा देखील उघडता आला नाही आणि परिणामी या दरवाज्यात बिबट फसला.

जानेवारी २०२३ मध्ये बाहेरुन आलेल्या बिबट्याने चांदणी नावाच्या प्राणीसंग्रहालयातील मादी बिबट्याला मारले. त्यावेळी या बाहेरुन आलेल्या बिबट्याला जेरबंद करुन पेंचच्या जंगलात सोडण्यात आले. तर आता राणी नावाच्या मादी बिबट्याला बाहेरच्या बिबट्याने मारले. याक्षणी प्राणीसंग्रहालयाच्या परिसरात बाहेरच्या दोन बिबट्याने प्रवेश केल्याची चर्चा आहे.

तत्कालीन कंत्राटी आणि नंतर कायमस्वरुपी करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापक, अभिरक्षक यांच्या हलगर्जीपणामुळे या प्राणीसंग्रहालयाचे व्यवस्थापन ढासळल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. गोरेवाडा प्राणिसंग्रहालयाच्या स्थापनेपासून येथे बाहेरचे बिबट प्रवेश करत आहेत.

मात्र, महसूल कमावण्याच्या मागे लागलेल्या प्राणिसंग्रहालय प्रशासनाला येथील प्राण्यांच्या सुरक्षेविषयी काहीच देणेघेणे नाही. सातत्याने या प्राणिसंग्रहालयात बिबट येत असतानाही प्रशासनाने कोणतीही काळजी घेतली नाही.

येथील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी प्रशासनाला ही बाब सांगितली. पण, त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. अननुभवी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या आणि नंतर नियमित केलेल्यायाच्या हातात गोरेवाडा प्राणिसंग्रहालय सोपवल्यामुळे त्याची मोठी किंमत प्राण्यांना मोजावी लागत आहे.

# ग्रॅन्डमास्टर दिव्या देशमुखला शासनाकडून ३ कोटींचे बक्षीस

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
नागपूरकर दिव्या देशमुखने फिडे महिला बुद्धीबळ विश्वचषकाचा अंतिम सामना जिंकून विश्वचषक आपल्या नावावर केला आहे. दिव्याचा शनिवारी नागपुरातील सुरेश भट सभागृहात शासनातर्फे सत्कार करण्यात आला . यावेळी दिव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ३ कोटी रुपयांच्या बक्षीसाचे धनादेश देऊन गौरवण्यात आले. यापूर्वीही तिला १ कोटी रुपयांचे बक्षीस दिले गेले होते.

नागपुरातील सुरेश भट सभागृहात शनिवारी महाराष्ट्र शासनातर्फे ग्रॅन्डमास्टर दिव्या देशमुख हिचा विश्वविजेती झाल्याबद्दल नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मंचावर क्रीडामंत्री मानिकराव कोकाटे, ॲड. आशिष जयस्वाल, महाराष्ट्र बुद्धीबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके, ग्रन्डमास्टर दिव्या देशमुख यांच्यासह आमदार व मोठे अधिकारी उपस्थित होते. फडणवीस पुढे म्हणाले, आता खेळाला सर्वत्र व्यवसायिक रुप येत आहे.

हाराष्ट्र शासन क्रीडा क्षेत्राला महत्व देत असल्याने देश पातळीवरील स्पर्धेत महाराष्ट्राचा क्रमांक आता वरचाच राहतो. शासनाकडून आता खेळाडूंना चांगले फिजिओथेरपीस्ट, न्यूट्रेशियनिस्ट, देशी-विदेशी प्रशिक्षकांसह इतरही सोय देण्याचे प्रयत्न आहे. पूर्वी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळायला जाणाऱ्या खेळाडूंसोबत प्रशिक्षकालाही जायची परवानगी नव्हती. तेथे खेळाडू महत्वाचा असतोच. परंतु त्याच्यासोबत प्रसिक्षकासह इतरही सोयी महत्वाच्या असतात. इतर देशातील खेळाडूकडे या सगळ्या सोयी राहत असल्याने आपल्या खेळाडूला अडचणी यायच्या. त्यामुळे शासनाने सर्व नियम बदलले. सोबत शासनाने खेळाडूंना आता मोठ्या प्रमाणावर रोख बक्षीसही देणे सुरू केले.

प्रत्यक्षात खेळाडूला विविध ठिकाणी स्पर्धेत सहभागी व्हायला गेल्यावर पैसा लागतो. कुटुंबाचीही मुलांवर खर्चाची मर्यादा असते. त्यामुळे पैसे नसलेल्या खेळाडूपुढे अडचणी यायच्या. काही स्पर्धेलाही मुकायचे.

शासनाने ही अडचण दूर करण्यासाठी रोख स्वरूपातील बक्षीस वाढवले. त्यामुळे होतकरू खेळाडू आता पैशाच्या कमीमुळे खेळापासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

दरम्यान दिव्या देशमुखला मागच्या स्पर्धेतील विजेतेपनानंतर शासनाने १ कोटी रुपयांचे बक्षिस दिले होते. आता ३ कोटी रुपयांचा धनादेश दिला आहे. हा धनादेश नकली दिसत असल्याने आता तो वठणार काय?, हे पैसे केव्हा मिळणार? हा प्रस्न अनेकांच्या मनात उपस्थित राहिल.

परंतु प्रत्यक्षात उधारी नाही तर दिव्याच्या खात्यात शासनाने एक दिवसापूर्वी शुक्रवारीच आर. टी. जी. एस.च्या माध्यमातून ३ कोटी रुपये वळवले असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दिव्या देशमुखनेही सत्काराबाबत महाराष्ट्र शासनासह नागपूरकरांचे आभार मानले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवर, शालेय विद्यार्थी, क्रीडा शिक्षक उपस्थित होते.






### आमच्याही खेळात नॉक आऊट, चेक मेट

देवेंद्र फडणवीस सत्कार समारंभात पुढे म्हणाले, मंत्रीमंडळ बैठकीत दिव्याच्या अभिनंदनाच्या प्रस्तावादरम्यान आमचे सहकारी मंत्री छगन भुजबळ मिश्किलपने म्हणाले, नागपुरातील लोकांची बुद्धीमत्ता जास्तच आहे. त्यामुळे बुद्धीबळात ते जास्तच गतीमान आहे. आम्ही राजकारणीही बुद्धीबळ खेळतो. परंतु राजकारणाचे बुद्धीबळ खेळतो. आमच्याही खेळात नॉक आऊट, चेक मेट केले जाते. त्यानंतर फडणवीस पुढे म्हणाले, दिव्याने जे यश मिळवले, त्यामुळे तिच्या नागपुरातील सत्कारातून सगळ्यांना प्रेरणा मिळेल. जागतिक बुद्धीबळ स्पर्धा महाराष्ट्रात खेचण्याचे प्रयत्न संघटनेकडून सुरू आहे. त्यात यश मिळाल्यास शासनाकडून सर्व मदत केली जाईल, असेही आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# आता कोल्हापुरातही मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ

### दीर्घ लढ्याला मोठे यश

■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २ :**
मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठासंदर्भात महत्त्वपूर्ण नोटिफिकेशन जारी करण्यात आले असून, येत्या १८ ऑगस्टपासून खंडपीठाचे कामकाज सुरू होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी १ ऑगस्ट रोजी यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केले.

या निर्णयामुळे कोल्हापूर, सांगलीसह सहा जिल्ह्यांच्या नागरिकांचा गेल्या 40 वर्षांपासून सुरू असलेला लढा यशस्वी ठरला आहे. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशांनी या निर्णयाची माहिती सर्वप्रथम माजी खासदार संभाजीराजेंना दिल्याचेही समोर आले आहे.

कोल्हापूरमध्ये उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन व्हावे, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होती. कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना याचा थेट फायदा होणार असल्याने नागरिकांनी सातत्याने आवाज उठवला. मात्र, या मागणीवर निर्णय होत नव्हता. यासाठी विविध संघटनांकडून अनेक वेळा आंदोलनेही करण्यात आली. अखेर या दीर्घ लढ्याला मोठे यश मिळाले असून, कोल्हापूर खंडपीठाच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, दिल्लीहून नागपूरकडे प्रवास करत असताना भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई हे विमानात माजी खासदार संभाजीराजेंच्या शेजारी होते. याच प्रवासादरम्यान सरन्यायाधीशांनी ही आनंदाची बातमी त्यांना दिली.

संभाजीराजेंनी सांगितले की, राजे, पहिली आनंदाची बातमी तुम्हालाच देतो, कोल्हापूरचे खंडपीठ सर्किट बेंच आजच नोटिफाय झाले आहे, असे सरन्यायाधीशांनी त्यांना सांगितल्याची माहिती संभाजीराजेंनी दिली.

दरम्यान, या नवीन खंडपीठामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील जिल्ह्यांना दिलासा मिळणार आहे.

# दिव्यांगांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वाटप

## महसूल दिनी आयोजन : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते वितरण



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
महसूल दिनानिमित्त नागपूरमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर दिव्यांग लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम नियोजन भवन येथे घेण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजना अंतर्गत शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या.

या माध्यमातून गरजूंना अन्नसुरक्षा प्रदान करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले. कार्यक्रमात नागपूर अन्न व नागरी पुरवठा विभागाचे विनोद काळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी शिधापत्रिका वाटपाच्या प्रक्रियेबाबत माहिती दिली आणि योजनेचा लाभ गरजूंपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. लाभार्थ्यांनी यावेळी शासनाचे आभार मानत आपल्या भावना व्यक्त केल्या.

महसूल मंत्री यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दिव्यांग व दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचवणे ही शासनाची जबाबदारी आहे आणि अशा उपक्रमांद्वारे ती पूर्ण केली जात आहे. या प्रसंगी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, जि .प .चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, महसूल, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच अनेक लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महासागर प्रभागमित्राचे दुसरे सभासत्र संपन्न








5 दशकांहून अधिक काळ समाजाच्या सेवेच्या कार्य प्रवासात महासागर प्रभागमित्र हा घटक जुळल्याने महासागर ची शक्ती वाढली आहे. या शस्त्राचा वापर करीत सामाजिक जीवन सुसह्य करण्यास बाधक ठरणा?या समस्या सरकारच्या निदर्शनात आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य करायचे आहे असे वक्तव्य महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी केले.

महासागर प्रभागमित्राचे दुसरे सभासत्र माहेश्वरी भवन येथे पार पडले. या सभेला महासागरचे मुख्य कार्यकारी अधिकारी यु. एस. लाल, व्यवस्थापकीय संचालक पंकज चांडक, कार्यकारी संपादक मनोज बागडे, पीआरओ कमल नामपल्लीवार, वरिष्ठ पत्रकार दिलीप दुपारे उपस्थित होते.

यावेळी उमाशंकर लाल यांनी मार्गदर्शन करताना प्रभागमित्राचे कार्य, कायार्चे क्षेत्र, त्यांच्या जबाबदाऱ्या या सोबतच दिवाळी व्यवसायावर मार्गदर्शन केले. प्रभाग मित्रांकडून त्यांच्या प्रभागातील समस्या पाठविताना घ्यावयाची काळजी व संबंधित विषयांवर संपादकीय विभागाकडून सूचना देण्यात आल्या . शेवटच्या सत्रात प्रभागमित्रांनी त्यांच्या अडचणी मांडल्या . महासागरकडून समाधान करण्यात आले.

# पोलीस महिलेचा संशयास्पद मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. २ :**



शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत ३८ वर्षीय पोलिस महिलेचा संशयास्पद मृत्यू झाला. मृत महिलेच्या गळ्यावर व्रण असून, या प्रकरणात घातपाताची शक्यता वर्तवण्यात येत आहे . आशा राहुल धुळे (तायडे) असे मृत महिलेचे नाव आहे.

१३ जुलैपासून आशा धुळे या वैद्यकीय रजेवर होत्या. त्यांना १४ वर्षांचा एक मुलगा तर ७ वर्षांची मुलगी आहे. आशा धुळे यांना अत्यवस्थ स्थितीत इर्विनमध्ये आणले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच तायडे यांच्या घरी परिसरातील नागरिकांची गर्दी झाली.

# आयआयटीमध्ये विद्यार्थ्याची आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**
आयआयटी मुंबईच्या होस्टेलच्या टेरेसवरून उडी घेऊन रोहित सिन्हा (वय २६) या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना रात्रीच्या सुमारास घडली. रोहित दिल्लीचा रहिवासी असून, मेटा सायन्स विभागात अंतिम वर्षाचा शिक्षण घेत होता.

त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे संपूर्ण आयआयटी परिसरात शोककळा पसरली आहे. रोहित अत्यंत हुशार, शांत स्वभावाचा आणि मेहनती विद्यार्थी म्हणून परिचित होता. विद्यापीठ प्रशासनाने त्याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. या प्रकरणी पवई पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून, पोलीस आत्महत्येमागील कारणांचा तपास करत आहेत. प्राथमिक तपासात शैक्षणिक तणाव, वैयक्तिक संघर्ष, किंवा इतर कोणतेही मानसिक आरोग्यविषयक कारण आहे का, याची चौकशी सुरू आहे. पोलिसांकडून रोहितच्या मित्रांशी आणि सहाध्यायांशी संवाद साधला जात आहे.

# डॉ. अमोल खत्री यांचे उद्बोधन

## दिनेश विश्व शिशुमंदिरात कार्यक्रम



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २:**
दिनेश विश्व शिशुमंदिरात बालकांच्या विकासासाठी आवश्यक आहार, आचार आणि विचार यांवर डॉ. अमोल खत्री यांनी आयोजित पालक सभेत पालकांचे उद्बोधन केले. यावेळी पालकांनीही बालकांच्या समस्येविषयी प्रश्न विचारून शंकेचे उद्बोधन केले. बालकांचा आहार कसा असावा यावर डॉ. अमोल खत्री यांनी मार्गदर्शन केले

शाळेच्या संचालिका विभावरी कुळकर्णी यानी पुढे होणाऱ्या कार्यक्रमाबद्दल पालकांना काही सूचना दिल्या. शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा देशमुख व इतर शिक्षिकांनी हा कार्यक्रम सादर केला या शाळेत भारतीय परंपरेनुसार सर्व सण साजरे केले जातात. त्यावद्दल मुलांना गोष्ट सांगून सणाचं महत्व पटवून दिल्या जाते.

यावर्षी सुध्दा दीपपूजेच्या दिवशी दिव्याचं पूजन करून त्याचं महत्व सागण्यात आलं. नागपंचमीला पालकांनी नागाची माहीती व चित्रे आणली, ती मुलांना दाखवून सापाची ओळख, त्याचे महत्व गोष्टीरूपात मुलांना सांगण्यात आले. अशाप्रकारे बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना करून दिल्या जाते.

# पोलीस दलातील सुनयनाची सूवर्ण भरारी!

राज्य, राष्ट्रीय व मग आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे देशाला कौतुकच. दिव्या देशमुखने गगनभरारी केली. त्याची चांगलीच चर्चा झाली. आता दुसरी एक कन्या सध्या जग जिंकून आली. ७६ देशातील स्पर्धकांचा सामना करीत तिने हे यश प्राप्त केले. सोने लुटून परतणाऱ्या या कन्येचे नाव आहे सुनयना डोंगरे.

त्या वर्धा पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून कार्यरत आहेत. खेळाडू म्हणून त्या जिल्ह्यास खाश्या परिचित. वर्ल्ड पोलीस अँड फायर गेम २०२५ या स्पर्धा इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे संपन्न झाल्या. त्यात जगातील ७६ देशांचे पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

या स्पर्धेत सुनयना डोंगरे यांनी एक सुवर्णपदक व एक रौप्यपदक पटकवले. फिजिक व बिकिनी अश्या गटात त्यांना हे पदक प्राप्त झाले. अंगावर तिरंगा लपेटून त्यांनी पदक स्वीकारले. त्यांचे पोलीस दलात अभिनंदन होत आहे. सामान्य भारतीयांना या वर्ल्ड पोलीस अँड फायर स्पर्धचे महत्व कदाचित माहित नसेल. मात्र क्रीडा क्षेत्रात यांस खास महत्व आहे.



सुनयना यांचा प्रवास थक्क करणारा आहे. खेडेवजा सेलूगावात त्यांचे वास्तव्य. पिढीजात मासेमारीचा व्यवसाय. शिक्षण दूरच. स्थानिक शाळेत शिकत असतांना त्यांना खेळाची आवड निर्माण झाली.

वडील विष्णु डोंगरे यांनी प्रोत्साहन दिले. मग याच स्पोर्ट्स कोट्यातून त्यांची पोलीस दलात निवड झाली. एकदा धाव स्पर्धेत पाय दुखावला. करायचे काय, हा प्रश्न. म्हणून मग हटके क्षेत्र निवडले.

२०२२ मध्ये शरीर सौष्ठव या क्रीडा प्रकाराचा सराव सुरू केला. आईने चांगले डायट देण्याची जबाबदारी घेतली. नाशिक पोलीस क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकले. त्या आधारे लखनौ येथे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत भरारी घेतली. हे यश त्यांना आंतरराष्ट्रीय कामगिरीसाठी पात्र करणारे ठरले.

काहीच दिवसात दिल्लो पोलिसकडून त्यांना फोन आला की पासपोर्ट तयार ठेवा. इंग्लंडमध्ये ह्य गेम्स ऑफ हिरोज ह्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्पधेर्साठी त्यांची निवड जानेवारी महिन्यात झाली. आणि आता या स्पर्धेत त्या दोन पदके खेचून मायदेशी परतल्या. हा आयुष्यातील सर्वोच्च गौरव क्षण, असे त्या सांगतात.

ही सुवार्ता कळताच वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याशी डोंगरे यांची भेट झाली. उपस्थित सर्वांसमोर तीचे अभिनंदन करण्यात आले. पालकमंत्री म्हणाले की जिल्ह्याचेच नव्हे देशाचे नाव उंचावणारे हे यश आहे. त्याची कदर केल्या जाईल. पदोन्नतीबाबत तरतुदी तपासून मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार. तुम्हास पोलीस इन्स्पेक्टर करण्यास सर्व ते प्रयत्न करू, अशी हमी पालकमंत्र्यांनी दिली.

आपली भावना व्यक्त करतांना सुनयना यांनी आजवर आईवडिलांच्या मदतीने केलेली धडपड कामात आल्याचे मत व्यक्त केले. या वाटचालीत जिल्हा पोलीस प्रशिक्षक राजूभाऊ उमरे तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रमोद हिवाळे यांची मोलाची मदत झाली. मुलींनी या क्षेत्रात पण पुढे आले पाहिजे, असे त्या म्हणतात. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी त्यांचे अभिनंदन केले.